
मधू शिरगांवकर
aOH Wm

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# रं ज ‘क’ था

लेखिका : मधू शिरगांवकर

# रं ज 'क' था

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# रं ज ‘क’ था

लेखिका : मधू शिरगांवकर

Plot 13, Mangaldham, Pune 411038

सम्पर्क- मोबाइल व व्हॉट्सॅप – 09822208197

ई मेल -- madhushirgaonkar@gmail.com

मुखपृष्ठ : साधना शिरगांवकर व कनका जोशी

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २० ऑगस्ट २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखिकेची ओळख



सौ मधू शिरगांवकर, वय ५३वर्षे.

पेशाने फार्मास्युटिकल ट्रेनर आणि कन्सल्टंट.

पती, सासू सासरे, दोन मुले व आईवडील यांच्यासह गेली २७ वर्षे पुण्यात वास्तव्य.

पन्नासाव्या वर्षी लेखनास सुरवात केली. लेखन करतानाचा आनंद सर्वात महत्वाचा आणि वाचकांची दाद ही सगळ्यात मोठी पावती असं मानते.

वाचता वाचताच लेखनाची सुरवात झाली. जवळपास ३० लघुकथा, पाच दीर्घकथा, अनेक ललित लेख, व सध्या एका कादंबरीचे लेखन सुरू आहे.

E mail : madhushirgaonkar@gmail.com

Mobile number: 9822208197

# रं ज 'क' था

## मनोगत

आयुष्य जगताना अनेक स्मृती मेंदू साठवत जातो. रोजच्या धकाधकीत, स्मृतींच्या या साठयाची आपल्याला जाणीवही नसते. पण मग अचानक कधीतरी, काही घडते. धक्का लागलेल्या मोहोळाप्रमाणे, असंख्य स्मृती, अचानक समोर येऊन उभ्या राहतात आणि म्हणतात आम्ही अशा विसरून जाण्यासारख्या नाहीच आहोत.

कथा लिहीत गेले. कथा काल्पनिकच, पण प्रत्येक कथेत कोणत्या ना कोणत्या स्मृतीने अलगद आपली जागा पक्की केली. घरचे, मित्रमैत्रिणी, मामबो परिवार ('माझा मराठीचा बोल' हा लेखनाची व वाचनाची आवड असणाऱ्यांचा फेसबुक ग्रुप), माझे पती श्री अतुल शिरगावकर, त्यांचा मित्रपरिवार, सर्वांनाच आवडल्या या कथा.

माझे मामबो परिवारातील एक जेष्ठ स्नेही, पंढरपूरचे प्रसिद्ध शल्यविशारद, डॉक्टर विजयकुमार आपटे, जे स्वतः एक उत्तम लेखक आहेत, ते म्हणाले "या कथांना 'मधू टच' आहे." त्यांच्या या अशा वेगळ्या कौतुकाने मला खूपच हुरूप आला. आपलीही एक शैली आहे लेखनाची असा विश्वास निर्माण झाला.

आज त्यातल्याच काही कथांना ' रंज'क'था ' या कथासंग्रहाच्या रूपात आपल्या समोर ठेवताना अत्यंत आनंद होत आहे. कथासंग्रहाला नाव काय द्यावं सुचत नव्हतं. माझे पती अतुल यांनी हा प्रश्न चुटकीसरशी सोडवला. यात गूढ, विनोदी, तर काही हळव्या कथाही तुम्हाला वाचायला मिळतील. तुम्हालाही या कथा तितक्याच रंजक वाटतील अशी आशा आहे. ईसाहित्यचे करावे तितके कौतुक आणि मानावे तेवढे आभार हे कमीच पडतील. ईसाहित्य चे वाचक अभिप्राय नक्की देतात हा या आधीच्या 'प्रतिबिंब' या दीर्घकथेच्या वेळचा आनंददायी अनुभव, याही कथासंग्रहाच्या बाबतीत येईल ही खात्री आहेच.

मधू शिरगांवकर

# अर्पण पत्रिका

माझी आजी, **स्व. निर्मलाबाई वझे, सावंतवाडी**, जिचा माझ्या जडणघडणीत अत्यंत मोलाचा वाटा आहे, तिला हा कथासंग्रह अर्पण करताना मला अत्यंत आनंद वाटतो आहे, कारण प्रत्येक कथेत कोणत्या ना कोणत्या स्वरूपात तिच्या व्यक्तिमत्वाची झलक मिळतेच.

मधू शिरगांवकर

अनुक्रमणिका

१. कात

२. ती फुलरानी

३. वेगळ्या वाटा

४. गिनती

५. जिंदगी के बाद भी

६. झिलू

७. सावी

८. गुंता

९. दुहेरी

१०. कामिनी

***While we may not be able to control all that happens to us, we can control what happens inside us.***

***Benjamin Franklin***

# कात

सुकांता अचानक भानावर आली. उन्हं पार कलायला लागलेली. 'कसं लक्षात नाही आलं आपल्या? इतकी कशी त्या काळ्या पाशात विरघळत गेले? आता घरी गेल्यावर सासूबाई कहर करतील. पण अंग कसं, हलकं, हलकं, पिसागत झालंय.' या विचारासरशी खुदकन हसू उमटलं तिच्या चेहऱ्यावर. ती चटकन उठली. ओचा नीट खोचला, पदर अंगभर लपेटून घेतला, आणि केवड्याच्या घनदाट बनातून, तो धुंद गंध आणि निळा थंडावा सोबतीला घेऊन भरभर घराच्या दिशेने निघाली. चालही अशी, की ना पावलांचा आवाज ना लुगड्याची सळसळ. सासूबाईंचा धाकच तसा होता.

घरासमोर येऊन पाहते तर बरीच गर्दी. बाहेरची ओवरी माणसांनी भरलेली. कोणी बोलत नव्हतं. सगळे गंभीर. हिच्या उरात कळ आली. 'बापूंचं तर काही बरं वाईट..... छेछे, ' विचारही करवेना. बापू, सुकांताचे सासरे, अंथरुणाला खिळलेले, कित्येक वर्षं! पण या जगात सुकांताला आपली वाटावी अशी ही एकमेव व्यक्ती.

सुकांता, आईबापाविना पोर, मामा मामीने त्यांच्या अठरा विश्वे दारीद्र्यातही तेराव्या वर्षापर्यंत सांभाळली, आणि पदर येण्यापूर्वीच उजवून टाकली. त्याना अजून तीन मुली उजवायच्या होत्या स्वत:च्या, हिच्याच पाठोपाठच्या.

सासर तसं यांच्या मानाने श्रीमंतांचंच म्हणावं असं. जमीन होती कोकणात, थोडी आंब्या पोफळीची बाग, दारात चारदोन गुरं, घरी खायला प्यायला, दुधा तुपाला काही कमी नव्हतं. कमी होती ती फक्त माणुसकीची. अफाट हाव असलेली सासू, आणि मिळेल तसं आणि मिळेल ते ओरबाडूनच घेण्याची वृत्ती बाळगणारा नवरा. किती जन्माचा बुभुक्षित होता देवासच ठावूक!

सासूने अंगावरचे दागिने पहिल्या दिवशीच काढून घेतले आणि नवऱ्याने शरीर ओरबाडले. पदर येण्याआधीच सगळा चक्काचूर झाला. एखादी वेडीच व्हायची, पण कसं कोण

जाणे त्या निकराच्या क्षणी सुकांताचे मन शरीरापासून अलग झाले. शरीर भोग भोगत राहिले, पण मनापर्यंत व्रण नाहीच पोहोचू दिले तिने कधी. आणि म्हणूनच शरीर क्षीण झालं तरी ओठांवर स्मित आणि डोळयातली चमक तशीच राहिली अबाधित. काळी पोत गळयात, चार काचेच्या हिरव्या बांगड्या आणि जुनेरी मिळत राहीली लज्जारक्षणापुरती. पण तेज कायम होतं.

लग्नानंतर मामा, उभ्या उभ्या का होईना, वर्षातून एक दोनदा विचारपूस करायला यायचा, येताना ऐपतीनुसार जावयाला, विहीणीला अहेरही आणायचा, पण दोघांनीही जिव्हारी लागावे अशा शब्दांनी घोर अपमान केला मामाचा, तेव्हा दारापर्यंत पोहोचवायला जाऊन सुकांताने मामास समजावले, "तेरा वर्ष पोटचा घास देऊन जगवलेस, दोनाचे चारही रितीप्रमाणे करून दिलेस. आता माझी काळजी नको. इथे येऊन अपमान करून घेण्याची गरज नाही. मला कधी लागलेच काही, तर मी येईन. तू पुन्हा येऊ नकोस. "ओलावलेले डोळे पुसत, मामा गेला. जणू मोठेपणाने आपली आक्कीच समजावते आहे असा भास झाला त्याला. तेव्हापासून माहेर सुटले ते कायमचेच.

आणि आता बापूही?

सुकांता मागील दारी गेली. ढोणीतील पाण्याने हातपाय धुऊन पदराला पुसत हळूच घरात शिरली. माजघरातून बाहेर डोकावली. पांढऱ्या कपड्यात देह गुंडाळून बाहेरच्या खोलीत जमिनीवर ठेवलेला. पण खाटेवर बापू हुंदके देत होते. तशाही अवस्थेत तिला जरा बरे वाटले. मग कोण? नवरा, सासू जरा दूर जमिनीवर फतकल मारून बसलेले दिसले. त्या दोघांना तसे पाहून हिला जरा नवलच वाटले. जमिनीवर ठेवलेल्या देहाचा चेहरा काही दिसेना, विचारावे तरी कोणास?

मग सरळ माजघरात बसून राहिली. हळूहळू सवयीने मन आठवणीत रमले.

पहिल्या काही रात्री अमानुष वागून नवरा काही दिवस नाहीसा झाला आणि ही जरा सावरली. हळू हळू घरदार पाहू लागली. बापूंच्या सेवेची न सांगताच संपूर्ण जबाबदारी घेतली. ते ही शब्दानी, माया, दिलासा देऊ लागले.

एक दिवस सासूबाई तापाने फणफणल्या आणि शेताकडे जाण्याची हिच्यावर वेळ आली. वाटेकऱ्याला बरोबर घेऊन निघाली. शेताकडे जाताना रस्त्यातच एका बाजूला यांच्याच जागेत केवड्याचे बन लागले. पोहोचण्यापूर्वीच सुगंध पोहोचला होता. त्या धुंद गंधाने ही वेडावून गेली. सरळ बनात शिरली. "धाकल्या वैनीनु, थय जाव नका, लांबडो आसता थय, " असे वाटेकरी विनवित असतानाच ही पार आतपर्यंत शिरली सुद्धा. त्याचे हिच्या मागे जाण्याचे धाडस झाले नाही. वाट पहात, हाका देत तिथेच थांबला.

सुकांता पार घोर बनात शिरली. आणि तो दिसला तिला. निळसर काळा, सळसळणारा, हिच्या आसपास अंतर राखून फिरत राहिला. एका विलक्षण ओढीने कधी ही त्याच्या मागे, कधी हा तिच्या, असे फिरत राहिले. सोबतीला केवड्याचा धुंद सुगंध. बेभान करणारा. शरीराची नस न् नस गंधाने आणि त्याच्या ओढीने सरसरून आली. त्या दिवशी सुकांता बनातून बाहेर आली खरी पण मनाचा एक हिस्सा जणू तिथेच सोडून आली.

आणि मग हे जवळपास रोजचेच झाले. 'धाकली वैनी' हे काही वेगळंच पाणी आहे हे त्या वाटेकऱ्याच्याही लक्षात आलं.

सगळयाना प्रेमाने वागवीत, सासूच्या नकळत वाटेकऱ्यांना पोटाला कमी पडू नये येवढे धान्य मागे ठेवीत, त्यांच्या दुखण्या खुपण्याला लागेल ती, जमेल ती, मदत करत सगळयांचा आशीर्वाद घेऊ लागली. वर्षामागून वर्ष सरत राहिली, मनावाचून शरीर, नवऱ्यालाही नकोसे झाले असावे, त्रास देईना झाला, त्याने लांब तिकडे कुठे, म्हणे, एक बाई ठेवून घेतली. हिला बरेच वाटले.

सकाळभर सासूच्या शिव्या तोंडी लावत गुपचूप कामे उरकावीत, बापूंना जेवायला घालून शेताकडे जावे, तिथले सगळे मार्गी लावून सरळ बनात शिरावे, आणि तो, ती आणि सुगंध असे एकरूप व्हावे. स्वर्ग म्हणतात तो याहून कोणता निराळा?

अचानक बाहेरून बापूंचा जोरात हुंदका ऐकू आला.

बाहेर येऊन पहाते तो लोक पुढच्या तयारीस लागलेले. सासूने त्या कलेवरास हिरवे लुगडे नेसवले, तोंडात मुहुर्त मण्याचा सोन्याचा मणी ठेवला, जो तो नमस्कार करून शेवटचे दर्शन

घेवू लागला. वाटेकऱ्याने केवडा सासूच्या हातात दिला. सासूने डोक्यात माळण्यासाठी कापड चेहऱ्यावरून बाजूला केले, सुकांताचा संपूर्ण देह काळा नीळा पडला होता.

सुकांता आज दुपारी बनात शिरली न शिरली तोच तो रोज लांबून प्रेमाराधन करणारा सरळ समोर वाट अडवून थांबला. पाहता पाहता सुकांताच्या शरीराला त्याने घट्ट विळखा घातला आणि सुकांताच्या मानेला प्रेमदंश केला. सुकांता केवड्याच्या सुगंधात, विरघळत, विरघळत गेली. परमोच्च सुखाच्या, परमबिंदूपर्यंत पोहोचली. सुकांताने "कात" टाकली.

पण मनाची सवय गेली नाही. सवयीने मन घरी पोहोचले आणि मृत शरीर पोहोचवले गेले.

बापूंनी टाहो फोडला, "अशी कशी गो मज एकट्यास सोडून गेलीस पोरी? "

सुकांता झटकन पुढे झाली, बापूंना म्हणाली, “अशी कशी सोडून जाईन तुम्हास एकटे, चला, धरा माझा हात, निघायची वेळ केव्हाच टळून गेली.”

बापूंची मान अलगद कलंडली!

# ती फुलरानी

आता खरं मंजी आसल्या खाजगीतल्या गोष्टी चव्हाट्यावर मांडू न्हाई म्हना, पन तुमी सगळं आपलेच म्हनायचे तर म्हनलं सांगतूच मनचं.

तेचं आसं जालं बगा, न्हेमीपरमानं आयनं नाश्त्याला बडविल्या भाकऱ्या, नि मी समूर बसून हानल्या, लय नाय उगा चारपाच, बरुबर झुनका, ठ्येचा, बुक्कीनं फोडल्याला कांदा, शेंगाची चटनी, आसं झकास लागत व्हतं म्हनताय. पर आला की बा तवर, नि लागला वरडाय उगा फुकाचा. कायतर म्हनं “इसाचा जालास पर काडीची आक्कल नाय, खायाला काळ न् भुईला भार, बकासुराची आवलाद”!

मंग म्या बी म्हनलो का “मंजी तुमी बकासूर म्हनाचं” आसला खवळला का नाय

बा, तेवर फोडनी म्हनून का काय, आय हासली माज्या बोलन्यावर, आंग मंग आसा पिसाटला, आसा पिसाटला म्हनताय बा, का हातातला बांबूच फेकून हानला मला.

आता थितं थांबन्यात काय राम न्हाय आसं वळकून म्या ताटावरून उटून जो सटाकलो तो पार श्येताच्या पारावरच येऊन ट्येकलो. पाय लावून पळून पार दमछाक जालली. पसारलो मंग थितच पारावर. जरा येळानं कायतर वाजलं म्हनून बगितलं तर ह्यी फुलरानी दिसली न्हवं काय. फुलाफुलांचा वर झगा, खाली तंग लेंगा, फुलाफुलाची वडनी, केसं आंगाश्शी लांब लांब खांद्यावर सोडलंली, व्हटांना लाली लावलंली, शेम त्या शिणुमातल्या नटीवानी दिसून राह्यलंली. म्या आसा तट्कन उटून बसलो न्हवं काय. म्हनलं काय सपान बिपान पडाय लागलं का काय आपल्याला. बा ला कळालं तर बडवित बडवित गावाभाईरच सोडून यायाचा त्यो. पन बगतो तो सपान बिपान काय न्हाय वो राव. चिमकुटा घ्येतला तो दुकला की वो जोरानशान. बगायलो तर ही फुलरानी निगाली की रानात, वर हासून हासून बगाय लागलंली माज्या तोंडाकडं.

आता कालचीच गोष्ट सांगतो तुमास्नी. त्यो गणप्या नि मारत्या भ्येटले रातच्याला चावडीवर. कायतरी गुचूगुचू बोलाय लागलेलं कानगोष्टी केल्यागत. म्या म्हनलं “मलाबी घ्या की रं तुमच्यात गप्पा ठोकायला.” तर कायबाय सांगून राह्यले न्हवं काय. “म्हनं कोनी पोरगी तुमच्याकडं बगून हासली आन् रानात, श्येतात शिरली तर वळकायचं का ही पटनार.”

“आरं तिच्या... मंग रं? “

“आरं मंग काय मर्दा! जायचं आपून बी रानात. नि मंग जसं जमल तसं चार शबुद बोलायचं. मंग ती बी बोलती हासून लाजून, मंग जरा अजून फुडं..

च्या मारी टोपी, आसं आसतय व्हय? आमाला दोनच पोरी म्हाईत गावात. येक सारकी शेण्या थापत बसल्याली चंपी, जिचं श्यान गोळा करती, त्या मारक्या म्हशीचं गूण हिच्या आंगात. जरा नजर वर करून बगायची सोय न्हाय राव, चुकून कदी बगश्याल तर त्या मारक्या म्हशीवानीच येतीय न्हवं काय आंगावर.

“घालू काय श्यान तोंडात? आया भनी न्हाईत व्हय रं मुडद्या” म्हनत.

आनि दुसरी मंदी. तिचा बा नि मोटा भाव मंजी कर्दनकाळाचं आवतार. जरा कोन मंदीकडं मान वर करून बगतोय आसं वाटलं तर मान मुरगाळून ठिवतील हातात.

पन आज आपलं नशीब लय जोरात. ही नटीवानी फुलरानी माज्या तोंडाकडं बगत बगत हासत हासत रानाकडं चाललंली. मंजी लाटरीच की वो लागली. मंग गणप्या मारत्या चं नाव घेतलं, दोन थितच जोर बैटका काडल्या, न् निगालो आपन बी रानाकडं.

जाऊन बगतो तर काय, ही फुलरानी गवताच्या गंजीवर ही आश्शी मरम्येड का काय म्हनत्यात तशी आडवी पसारलेली. केसं वाऱ्यावर उडायलीत. वडनी वाऱ्यावर उडायलीय. हितं

आमचं काळीज वाऱ्यावर उडून राह्यलं ना राव! येका हातात मोबायल घिवून शेल्फी काडायली. आता गवताची गंजी आतून गवत काडून काडून पार पोकळ जालंली, पर फुलरानीला सांगावं कसं? उगा पडली बिडली म्हंजी फुलरानीची लंगडी रानी व्हाया कितीसा येळ लागतूय सांगा. पन मंग तिनंच मान येळावून पाह्यलं न्हवं काय आनि म्हनली "हात द्येता काय जरा? मला बाय उंचावरून भिती वाटते." आता दुसरं तिसरं कोन आसतं, तर त्येला चार श्या हासडून बोललो आसतो का "भ्या वाटतय तर चडाय कोनी सांगितलं व्हतं रं xxxx ? डोकं ग्हान ठिवलं व्हतंस काय?" पर फुलरानीला आसं कसं बोलनार?

मंग ग्येलो जवळ, आन् क्येला फुडं हात तर ही, ल्हान प्वार कड्यावर घ्ये म्हनताना जसं दोनीबी हात करतय तसं दोनीबी हात फुडं करून राह्यली. च्या मारी टोपी! आता रं? मंग परत गणप्या मारत्याचं नाव घितलं आन क्येले मी बी दोनी हात फुडं तर भसकन् मारली की उडी हात धरून. आता पोकळ गंजी कशाला ऱ्हाईल हुभी ? मंग म्या खाली, फुलरानी माज्यावर, आन् गंजी आमच्या दोगांवर आसं कायतर भलतंच घडलं ना राव. भाईर येता येता नाकी नव आले न्हवं काय. पन आंगात आशा इजा चमिकल्या, आशा इजा चमिकल्या म्हनताय का आरारारारा! काय बोलाची सवडंच ऱ्हायली न्हाय राव. मंग "सारी सारी सारी हं " आसं कायबाय म्हनत उटली बाय आन् मंग मी बी उटलो. फुलरानी परत येकदा ग्वाड हासली. "अय्या किती छान हाये तुमचं श्येत" म्हनली. मंग म्या बी हासलो. चार शबुद म्या बोललो, चार ती बोलली, नाव गाव इचारून जाली. आज शऱ्हाच्या गावी जानार, तर उद्या येता का म्हनली. आन् आस्सं ग्वाड हासली बगा, का माज्या काळजाचं जालं पानी पानी. मी थितंच ऱ्हाते म्हनली. शऱ्हात. उद्या भेटू म्हनली. मंग म्हनली मोबायल नं द्या मी फोन करन म्हनली.

जालं, घरला आलो तो हवेत उडतंच की राव. आय म्हनली का "काय जालं? "म्या बोललो "का उंद्याच्याला शऱ्हात जानार आपून. थितच कामधंद्याचं बगनार. बा ला सांग म्हना काय नगं उगा तेचा रुबाब. आस्सा पैका कमिवतो बग, तुला रानीवानीच ठिवतो सा म्हयन्यात."

आय ला गह्यवरच आला बगा. लागलीच म्हवरीच्या डब्यात लपिवलेले दोन हज्जार रुपे दिले काडून. म्हनली बा याच्या आत दे ठिवून. म्या बी दोन कापडं भरली पिशवीत, आयनं दिलेला पैका बी ठिवला. फाटंलाच निगलो. श्टँडला आलो तर गाडी हुबीच व्हती. बसलो. आता फकस्त फुलरानी भ्येटली का जालं. तिचंच सपान बगत झोपलो गाडीत. जाग आली शऱ्हाच्या आवाजानं. आगागागा! काय ती गर्दी का काय म्हनाची? आमच्या श्येतात येक डाव नागोबा दिसला व्हता तवा दोन तीन वारुळं फोडली व्हती त्येला सोदाया. तवा जशा मुंग्या भाईर पडल्या व्हत्या झुंडीनं तेचीच की वो आटवन जाली. श्टँडात गाडी आली नि समदी मानसं बिगी बिगी उतारली. कंडाक्टर वराडला का “पावनं उतरताय का जायचय म्हागारी” तवा ध्येनात आलं का आपल्याला बी उतरायचं हाये. मंग उतारलो. थितच येका बाकड्यावं बसून, आयनं बांदून दिलंली भाकर खाल्ली, पानी कुटं दिसतय बगाय लागलो तर मोबायल वाजलाच की “दोनशे खिडक्या नवशे दारं..... “ बटनाचं नरडं दाबून कानाशी लावला तर पल्याड व्हती फुलरानी. ग्वाड आवाजात म्हनली का “पोचला का तुमी?” आस्सं फुलून आलं बगा मनात त्यो निसता आवाज ऐकून. म्हनलं “व्हय. आताच पोचलो.” मंग म्हनली “वेलकम आमच्या शऱ्हात. थितच थांबा मी माज्या काही मैतरांना घिऊन येते मंग आपन जेवाय जावू. त्येना तुमाला भेटायचय” म्हनली. आरं तिच्या शऱ्हात ऐकाव ते नवलच राव. आय बा च्या आदी मैतरमंडळी ! मंग थितच बसलो वाट बगत. लय वाडूळ जाला तवा आली समदी. पोरं पोरी दोगंबी प्यांटी आन् शर्टात. पन फुलरानी व्हती फुलाफुलाच्या झग्यात आन् तंग ल्येंग्यात. सगळी बसली फटफटीवर. फुलरानी म्हनली “बसा माज्या मागं.” ढांग टाकून बसलो खरा, पन खरं सांगतो लय भ्या वाटून ऱ्हायलं मला. निगली आमची वरात जेवाया. जरा गाडी फुडं ग्येली न् काय उडाली न्हवं काय माजी टोपी. म्या वरडाय लागलो “माजी टोपी टोपी” तर फुलरानीसकट समदी खी खी खी करून हासली. आपल्याला काय आवडलं नाय ते. पन सांगनार कोनाला. मंग पोचलो येकदाचे बिना टोपीचच हाटिलात. मंग कुनी काय कुनी काय मागवलं. समदं विंग्रजीत लिवल्यालं. मंग येका नावावर ब्वाट दिलं ठिवून त्या पोऱ्यासमूर. येक डाव माज्या तोंडाकडं पायलं त्यानं, मंग फुलरानीनं खून केली तसा मान हालवून ग्येला बेना.

'हिचा लईच वट दिसतोय हितं' मी मनात म्हनलो. मंग फुलरानी हुबी ऱ्हायली नी बोलली का "गाईज!" म्या पट्कन हुटून हुबा ऱ्हायलो का "कुटयत गाई?" समदी फिदी फिदी हासली.फुलरानीनं हाताला धरून बशिवलं खाली. काय सुदरलंच न्हाई. मंग म्हनली "हा माजा, गावचा, खास मित्र शंकर, आपल्या समद्यास्नी भेटाया आलाय आनि आपल्या समद्यास्नी पार्टी द्येनार हाये." मंग तिनं समद्यांकडं बगून डोळा घातला. मी म्हनलं 'बरं जालं आये ते पैकं दिलस न्हायतर फसगत व्हती ठरलेली. फुलरानी आपल्याला खास मित्तर म्हनली व्हती. "चांदी जाली तुजी शंकऱ्या लेका, " आसं म्हननार गनप्या नि मारत्या भेटतील तवा.' मंग समद्यांनी टाळया वाजिवल्या. माजं हात हातात घिवून "गलाड टू मीट" आसं कायबाय बोलले. मी बी तोंडावर हसू घिवून ऱ्हायलो. मंग समद्यांच्या फुड्यात त्या मगाच्या पोऱ्यानं काय काय आनून ठिवाया सुरवात केली. जो तो खायाला लागला. आपल्यावानी न्हाय राव, का समद्यास्नी मिळस्तोवर थांबाचं, मंग 'पुंडलिक वरदे हारी विट्टल म्हनाचं, मंग येकामेकाला आग्रीव करून, करून, खाया घालाचं, तसं काय न्हाईच राव हितं. फुलरानी मात्तर थांबली व्हती. तिलाबी काय मिळालं न्हवतं आजून. मंग त्या हाटिलची चार पोरं येक भली मोटी अन्नानं भरल्याली थाळी घिवून आली नी ठिवली की माज्याफुडं. थाळी कसली वो, बकासुराचीच थाळी म्हना की. समद्यांनी पटापटा फोटू काडले. (हितंबी हायित म्हनं येक दोन तुमास्नी बगाया. ) म्या बगतंच ऱ्हायलो. आता आपून बैटकिला धा बारा भाकऱ्या हादडतूच म्हना. ह्ये पन खानं काय आवगड न्हवं, पन पोळयाला बैलाच्या समूर कसं ह्ये येवडालं घालत्यात, न् मंग बगत बसत्यात तसं वाटून ऱ्हायलं ना राव.

फुलरानीला इचारावं म्हनून बगितलं तर ती पळत ग्येली दरवाजात आनि शिणुमातल्या हीरोवानी येकजण आत आला तर पडली त्येच्या गळयात. माजं तर आवसानच गळालं. मंग म्हनलं भाव बिव आसल. मंग माजाजवळ यीऊन म्हनली का शंकर "ह्ये महेश माजा व्हनारा नवरा." तोंडातला घास कडू कडू जाला माज्या.

तवर समदीच उटली. फुलरानी म्हनली शंकर “थांक यू फार पार्टी. आम्ही निगतो. तू जेव हां निवांत. मंग बिल दे आनि रिक्षा करून जा श्टॅंडवर. सोडत्याल तुला. आमाला उशीर व्हाय लागलाय.”

मंग मी बी संपिवलच समदं जेवन. समद्यांचं मिळून पैकं जालं १९४० रुपे म्हनं. आगागागा! काय म्हागाई म्हनाची का काय! प्वाट फुटस्तोवर खाल्लंलं पर विलाजच न्हवता. निगलो चालत, इचारत, इचारत, श्टॅंडवर आलो. तीस रुपेचं तिकिट घिऊन बसलो गाडीत. भरल्या पोटावर आली सुस्ती नि मंग सपान. फुलरानी सांगत व्हती “ह्यो शंकर माजा व्हनारा नवरा. महेश सावकाश जेव आन् बिल भर रिक्षा करून घरला जा.”

काचकन ब्रेक मारला डायवर नं. त्योच कंडक्टर परत वराडला “पावनं काय इचार? जाताय घरला का येताय परत शऱ्हाला?” म्या पाट्कन उतरलो न् काय.

तर मंडळी तुमाला म्हनून सांगतो पोरगी हासली तर समजा का धोका! फुडं जाव नगा!

# वेगळ्या वाटा

रोजच्यासारखे निलिमा राजीव फिरायला बाहेर पडतात. तीच वाट नेहमीची. गेटमधून एकत्र बाहेर पडतात पण काही मिनिटातच दोघांमधे अंतर पडायला लागतं. कितीही प्रयत्न केला तरी निलीमा ते अंतर कमी करू शकत नाही. पार दमछाक होते तिची. शेवटी ती प्रयत्न सोडून देते. करूण हसू उमटतं तिच्या चेहेऱ्यावर. चालत राहाते पण. रोजच्यासारखी सवयीने. अंतर राखून. चालण्यात पडलेलं अंतर महत्वाचं नसतं, पण मनांमधे पडलेलं अंतर तिला विषण्ण करतं. केव्हा आणि कसं पडत गेलं हे अंतर? कुठे चुकलं समिकरण? डावी बाजू चुकली की उजवी? कोण ठरवणार?

“मिसफिटस् आहेत दोघे एकमेकांना!” यांचं प्रेमप्रकरण चालू होतं तेव्हा कोणीतरी मैत्रीणीजवळ मारलेला शेरा अचानक आठवतो. काट्यासारखा खस्सकन मनात रुततो. खरंच होतो का मिसफिटस्? हो म्हणजे आवडी निवडी नव्हत्याच कधी सारख्या. ना जेवणाखाण्यात, ना विचारात. पण तेव्हा या वेगळ्या विचारांचीच तर भुरळ होती पडलेली मनावर. एकमेकांना आवडेल ते, स्वत:च्या मनाविरुद्ध करण्यात एक नशा होता. चुरशीने, हौसेने, एकमेकांसाठी करायचो आपण.

मग मुलं झाली. आपण पार गुंतूनच गेलो त्यांच्यात. प्राथमिकता बदलली आपली. तेव्हा ‘तो’ एकटा पडला का? का पण? मुलांवर जीव टाकायचा अगदी. ती ही बाबा बाबा करत चिकटायची त्याला. पण तेव्हा एक बारीक तेढ आली असावी त्याच्या मनात, की आता हिला मुलं महत्वाची झाली. राजीवचा तापट स्वभाव, जो आधी कधी, एवढा नव्हता जाणवला, तो प्रकर्षाने जाणवायला लागला. एखाद्या गोष्टीत मत दिलं, तर “तुला काय कळतय? तू गप्प बस, ” असं आणि बरंच अपमानकारक तो बोलला, त्तेव्हा प्रथमच जाणवला आपल्या नात्यातला आदराचा अभाव. हादरलो खरं तर आपण. पण रागाच्या भरात बोलतो काहीही, नंतर क्षमाही मागतो

मनापासून, असा विचार करून सोडून देत गेलो आपण. चुकायला तिथूनच सुरवात झाली का? हो कदाचित. मग कधी तिच्या वागण्यावर टीकाटीप्पणी, कधी तिच्या घरच्यांवर. मनातलं काही बोलायला जावं, तर लगेच जजमेंट देणार की हे कसं चूकच आहे. हळू हळू तिची भुमिका फक्त श्रोत्याची झाली. बोलायची इच्छाच गेली.

निलिमाचं लक्ष जातं पुढे, वाट वळलेली असते. राजीव बराच पुढे निघून गेलेला असतो. ती सरळ रस्त्याकडेच्या बाकावर बसते. तेवढ्यात तो मागे वळून पाहातो. हिला बसलेली पाहून चेहरा त्रासिक होतो त्याचा प्रचंड. कपाळ, आठ्यांनी भरलेलं, इतक्या दुरूनही जाणवतं तिला. पण नेहमीप्रमाणे ती घाई घाईने उठून निघत नाही. बसून राहते तशीच. नाईलाजाने तो हाताने 'काय' असं विचारतो. ती 'जा पुढे मी इथेच बसते' असं खुणेनेच सांगते. त्याच्या चेहे्ऱ्यावरचा राग इथूनही जाणवतो तिला. नकोशी वाटते ती धग आज. हल्ली बरंच काही नकोसं झालय आपल्याला. तिच्या लक्षात येतं.

मुलं आपापल्या मार्गाने गेल्यापासून त्याचा स्वभाव दिवसेंदिवस अधिक त्रासिक होत चाललाय. बाहेर पडलं, की सतत त्याला खड्डे, ट्रॅफिक, वर आलेले ड्रेन कव्हर्स, वेडीवाकडी गाड्या चालवणारी मुलं, रस्त्यात मधेच उभे राहून गप्पा मारणारे पेन्शनर, अशा बऱ्याच गोष्टींचा त्रास होतो. मग तो सतत त्यावरच बोलत, तक्रार करत राहतो. तिला वाटतं, कशाला एवढा त्रागा करायचा? काहीच चांगलं, आनंददायक का नाही दिसत याला? पुर्वी नव्हता हा असा. उत्साही होता. पण हल्ली हे सारखं असंच.

हिच्यावरही सारखं डाफरणं सुरूच. कितीही, आणि कसंही केलं तरी ते पुरेसं चांगलं नसतच कधी, हे तिला लक्षात यायलाही फार वर्ष गेली. मग मात्र तिने आटापिटा करणं सोडून दिलय हल्ली. आत्ता या बाकावर बसल्या बसल्या निलिमा ला अचानक स्पष्ट जाणवतय की काहीच नाही उरलेलं आता दोघांना हवसं. केवळ सवयीने, मुलांच्या विचाराने, समाजामुळे एकत्र राहतोय आपण. सवयीनेच फिरायला निघतो बरोबरीने. वाटही एकच असते, पण मार्ग

निरनिराळे. संवाद उरलाच नाहीय काही. एक एक दरवाजा बंद होत गेलाय नकळत. तो ही दोन्ही बाजूंनी. निलिमाला आता प्रयत्नही करावासा वाटत नाही. ऋणानुबंध संपत आले का आपले? किती परके झालोय आपण एकमेकांना. तरीही गरगर फिरत राहतो समांतर अंतर ठेवत.

वाढवावं का हे अंतर, इतकं वाढवावं की ते मोकळं करेल दोघांनाही? त्याचीही तीच गरज असेल कदाचित? कळत नसेल, कळलं तरी बोलणार नाही तो असं काही.

ती बाकावरून उठते, आणि सावकाश चालत निघते विरुद्ध दिशेने. वेगळ्या वाटेवर. तिच पडणारं प्रत्येक पाऊल तिला मुक्त करत जातं. आणि त्याला? ते तोच सांगू शकेल, पण तो सांगणार नाही, माहीत आहे निलिमाला. पण कदाचित बदललेली वाट त्यालाही हवीच असेल. निलिमा स्वत:चं समाधान करून घेते.

राजीव ला लक्षात येतं निलिमा बरीच मागे राहिली. हे ही रोजचच. तो वळतो, पण नेहमीसारखी धापा टाकत ती मागून येताना दिसत नाही. आता कुठे थांबली? भेटलं असेल कोणीतरी, टाळून पटकन पुढे यायचं जमतच नाही हिला.

फिरण्याचे आता वाजले बारा. तितक्यात त्याला ती बाकावर बसलेली दिसते.

निलिमाला मधेच बसलेली पाहून त्याच्या कपाळावर आठ्यांचं जाळं पसरतं. किती आळशीपणा हा! फिरायला बाहेर पडायचं तर कसं उत्साहाने, भरभर चालावं, तर व्यायाम होणार. असं रडत खडत, जीवावर आल्यासारखं पाय ओढत चालण्यात कसली आलीय मजा? हिलाच खरी गरज आहे फिरण्याची. माहेरहून डायबेटीस मिळालाय आंदण. काळजी नाही घेतली तर कसं चालेल? मनातल्या विचारांचे पडसाद चेहऱ्यावर उमटतातच. तो खुणेनेच विचारतो 'काय झालं? ' पण ती आज लगबगीने उठत नाही. 'तू जा पुढे मी बसते' अशी खूण करते. हे नेहमीपेक्षा वेगळं असतं. इतर वेळी याने मागे वळून पाहिलं की हिची संथ चाल थोडी का होईना

गती घेते, बसली असेल, तर उठून चालू लागते. तिथूनही तिच्या चेहऱ्यावरची वेदना दिसते त्याला. काय झालंय? बरं नाही वाटत का हिला? पण तो पुढे चालत राहतो, विचारांच्या वेगानेच.

मी फार डाफरतो का तिच्यावर? बोलत नाही ती काही, पण अलिकडे चेहरा कडवट होतो तिचा. बराच वेळ मग गप्प बसते. हल्ली गप्पच असते खरं म्हणजे. पूर्वी कशी सतत चिवचिवत असायची आपल्या आसपास. आवडायचं ते आपल्याला. हळू हळू कमी होत गेलं. कसं आणि कधी ते काही कळलंच नाही.

मुलं मोठी होत होती तेव्हा भरपूर कष्ट घेतले तिने, एकहाती सगळं सांभाळलं, मुलांचे अभ्यास, खाणं पिणं, घरातल्या थोरांची सेवासुश्रूषा, पै पाहुणा, सगळंच. आपण पैसे कमावण्यात, नाव कमावण्यात व्यस्त होतो तेव्हा. आपल्या मानाने बुद्धीमत्तेत कमी आहे जरा. स्मार्ट म्हणावी अशी नाहीच. हळू हळू हे लक्षात येत गेलं. गप्पा रंगल्या नाहीत मग कधी. आपले विषय निराळे झाले. तिचे विषय... काय होते खरे तिचे विषय? तो चमकतो. आठवतच नाही आपल्याला, काय आवडतं तिला? 'किती बालीश आवडी आहेत तुझ्या' असं म्हणाल्यावर हिरमुसली होती खरी मागे एकदोनदा.

कधी कधी, फालतु चुका करते, नी बोलणी खाते. सगळे फसवतात हिला. कामगार बायकाही. पण स्मार्ट नव्हती, म्हणूनच घरी बसली, आपल्या आईवडिलांचं कसं होईल ही चिंता नाही वाटली कधी आपल्याला. राजीव परत मागे वळून पाहतो. निलिमा दिसत नाही कुठेच. बाकावरही नसते बसलेली. 'अरे गेली कुठे ही?' तो उलटपावली परत फिरतो. नकळत त्याचा चालण्याचा वेग वाढतो. 'बरं वाटेना म्हणून घरी गेली का? मगाशीच परत फिरायला हवं होतं आपण. छे!' तो घराच्या वाटेवर येतो. निलिमा तिथेही दिसत नाही त्याला.

अरे, 'गेली कुठे ही? एवढ्या लवकर घरी पोहोचणं शक्यच नाही ही.' त्याची काळजीची शोधक नजर सगळीकडे सरसर फिरते. लांब तिकडे विरुद्ध दिशेला निलिमा एका बुचाच्या झाडाखाली बसून फुलं वेचताना दिसते.

राजीवचा पारा क्षणात चढतो. 'वेडी आहे का ही? सांगून जाता येत नाही? आणि इतक्या दूर आली, तर नेहमीच्या रस्त्यावर यायला काय झालेलं भराभर?' तो तावातावाने निघतो, ओरडण्याच्या तयारीने, आणि अचानक ब्रेक लागावा तसा थबकतो.

"रोज काय रे त्याच त्या वाटेने जायचं? आज वेगळया वाटेने जाऊया ना. तिकडे जाऊ चल. रातराणी आणि मधुमालतीचा किती छान सुगंध दरवळतो तिथे."

"छे, छे, त्या रस्त्यावर जराही चढउतार नाहीत. काही व्यायाम होत नाही. नेहमीच्याच रस्त्याने जाऊ." पुर्वी कधीतरी झालेला संवाद आठवतो त्याला.

ह्या अशाच कितीतरी वेगळया वाटा आपल्यासाठी तिने ईच्छा असूनही सोडून दिल्या. आपल्या वाटा निश्चित फायदेशीर, अधिक योग्य होत्या यात शंकाच नाही. पण तिच्या मनातल्या वाटा नव्हत्या त्या.

राजीव सावकाश मागून जातो, ओंजळभर फुलं गोळा करतो, नि तिच्या समोर धरतो. निलिमा चमकून पाहाते. पटकन सवयीने उठू पाहते. मग परत बसते खाली. काहीशा निकराने. तो तिला न्याहाळत शेजारच्या कट्ट्यावर बसतो. चालू दे तुझं सावकाश, तोपर्यंत मी राहिलेलं प्राणायाम करतो, या इथे बसून. मग जाऊ बरोबर परत, तुझ्या वाटेने.

# गिनती

एकदा एक अजब माणूस भेटला. पाठमोरा पाहूनही अगदी फाटकी आसामी दिसत होती. बसलाही होता अशा विचित्र जागी. टेकडीवरच्या खाणीच्या पात्रातल्या कोरड्या वाळूत.

मी वरूनच पाहिलं. शुक शुक केलं. का केलं? कोण जाणे? केलं खरं. त्यानेही वळून पाहिलं. हात करून खाली बोलावलं त्याने मला. मी ही गेले खुळ्यासारखी. चढणार कशी वर परत, काही विचार नको? पण गेले तर खरी.वाळूतले बारीक बारीक खडे घेऊन मोजत होता.

म्हटलं “काय करतोयस हे?

म्हणाला जिंदगी गिनतोय.

म्हटलं “काय? कोणाची?

म्हणाला “समद्यांची”

“तुझी मोजलीस का ? जिंदगी?”

तर म्हणाला, “न्हाय त्या चौकशा नगत, तुजी हवीय काय मोजून?”

“कशी मोजणार?”

“परत तेच! सांगलं ना चौकशा नगत“

म्हटलं “काय करू मोजून?”

“हां ह्यो बराबर सवाल! पन मोजल्याबिगर कळनार कसं, काय करायचं ते?”

मी ही मग हट्टालाच पेटले. म्हटलं “असं नाही, आधी सांग, कशी मोजणार, आधी किती जणांची मोजलीस? मग ठरवते.”

हसला, जोरजोरात. त्याच्या फाटक्या व्यक्तीमत्वाला न शोभणारं.

“का हसलास?”

म्हणाला “ह्योच त्यो येडेपना! आधी खुळ्यावानी या घळीत उतरायचं, आपल्या कुवतीचा इचार न करता, आनी आता पुरती माज्यावर अवलंबून हाईस इथून भायेर निगायला तर तुझ्या अटी कसल्या ठिवती माझ्या सामने ? येडी औरत!

मी उतरले कुठून नि कशी, ते च कळेना. शेवटची उडी जरा जास्तच उंचावरून मारली होती खरी सपाट कड्यावरून. वर चढायचं तर कोणी हात द्यायला लागणार.

‘हं, असं झालय का? आता याला जरा गोडीनेच हाताळायला हवय.’मनात म्हटलं.

“मला बनवायचा प्लॅन काय करती गं मुर्खासारखी? जिंदगी गिननी है की नही? न्हाय म्हन वर जायचा रास्ता दिखाता तुरंत! तो तिरसटासारखा ओरडला.

'याला कसं कळलं? मी मनात बोलले!'

"परत त्येच, ए बाय लवकर हो, न्हाय बोल नि मला मोकळा कर. उगा जालं इनू नगस मनात. अडानी कुटची!

मी जळफळत विचारातच अजूनही.

'न्हाय' म्हनवना ना? वाटलच व्हतं! मंग घे मोजून! का? हिम्मत न्हाय होत?"

"मोजशील म्हणजे नक्की काय मोजशील?"

आता मात्र उठलाच जागेवरून तो.

"धंद्याच्या टायमाला खोटी नाय करायची हां. मी बोलावली का तुला इधर? तुच दिला ना आवाज?"

"अरे हो, पण नीट कळल्याशिवाय सौदा करणार कसा ना?" मी जरा नरमाईने म्हटलं.

"घ्या! काय येक येक नग भेटतात. एकतर हिच्यापायी माजी गिनती चुकली. वर येळ खातेय भोचक बाई! पण आता नाय सोडणार. आता घ्यायचीच मोजून जिंदगी!"

त्याचं मोजणं झालं सुरू परत.

“तू मोजतोयस आताही? माझ्याशी बोलत बोलत? “

“आरं तिच्या? आगं बये, ह्ये अखंड काम न्हाय काय? थांबता कसं यील?”

“म्हणजे? “

“ये, अडानी, सिकली सवरली दिसतीय पर हाईस लयच अडाणी! हं, साट नि पाच! “

“कोणाचे?” मी हादरलेली.

“तुझे न्हाईत”

“हुश्श्य!

“तुझे मोजू? “

“छे छे, भलतंच. माहीत झालं तर संपलंच की रे सगळं.”

“आणि न्हाई मोजले तर संपायचे ऱ्हातील काय? गिनती तो चलती ही रहेगी ना ?”

“मग आता? “

“आता काय? गीनू के नही?”

“नहीं नहीं बिलकुल नहीं!! “मी भराभर वाट शोधत निघाले.

तो माझ्या मागेमागे.

“अरे, गीन लो, गीन लो, ऐसा मौका बार बार नहीं आयेगा.”

“नको रे, सोड माझी वाट. जाऊ दे मला.” मी घायकुतीला येत पुटपुटले.

खदाखदा हसला मग.

चढून जाता येईल अशा रस्त्याकडे बोट करत हसत हसत बोलला, “मै तो गीनूंगाही!! तुला हवय की नकोय कोन इचारतय व्हय?

मी त्याक्षणी वळले नि फसले, मोहात पडले, ! त्याने मग एक फाट्कन आकडा फेकला तोंडावर.

बस, तेव्हापासून आयुष्याचा प्रवाह वाहत चाललाय, मी मात्र काठावर कोरडी फक्त मोजतेय, वाट पाहत त्या आकड्याची.

“शुक शुक, ओ बाई, ” कोणी तरी हाक मारली, वर पाहीलं तर एक तरूण मुलगा. मी बोलावलं हात करून.

“काय करताय?”

“आयुष्य मोजतेय”

“कोणाचं?”

“ज्याला मोजून हवय त्याचं!!”

“तुमचं मोजलंत?”

मग मी हसले मनात खदाखदा! जाळ्यात मासा फसला !

# जिंदगी के साथ भी......

ममा, ममा,

“............”

ममा, ए ममाsssss

हं?

आपण कुठे चाललोय?

“..............”

सांग ना गं, आपण कुठे चाललोय? ममाssssssssss अं........ कट्टी..... सांग ना गं.........

हो रे राजा.

हो रे काय? सांग ना आपण कुठे चाललोय? आपल्या डॅडाला आणायला??

हं!

पण तो का गेला आपल्याला सोडून? ती ओल्ड् ऑन्टी कोण होती गं?

अरे पिल्लू, ते बघ तिकडे, मोर बघ....

कुठय मोर?

तो बघ तिकडे लांब?

मोर मोर मोर...... कुठय ममा मोर ? मला नाही दिसला.

अरे तू बघेपर्यंत गाडी पुढे गेली ना?

ओह शिट्!

शु! असं नाही म्हणायचं बेटा!

कसा होता गं मोर?

मस्त मोठ्ठा पिसारा होता. निळीशार चकचकीत मान होती.

आता दिसला की मला आधीच दाखव हं!

हो हो, नक्की.

---

डॉक्टर वाट्टेल तेवढा खर्च होऊ दे, पण आमचा मुलगा वाचला पाहिजे. काहीही करा, आणखी दिल्ली, चेन्नई, परदेशातून डॉक्टर बोलवायचे तर बोलवा पण आमच्या मुलाचा जीव वाचलाच पाहिजे.

काहीतरी करा ना डॉक्टर. कित्येक तास झाले माझा मुलगा डोळे का उघडत नाही?

गणराया, वाचव माझ्या पोराला, लाखांची देणगी देईन, कडक निर्जळी संकष्टी करीन, माझा मुलगा माझ्या पदरी घाल.

---

ममा, (डोळे चोळत ) ममा..... तू कुठय?

इथच तर आहे बाळा.

आपण कुठं आलोय? डॅड कुठय?

अं? डॅड ना ? त्या ऑफिस मधे आहे.

तिथे काय करतोय?

अकांऊट क्लिअर करतोय बेटा!

ॲकाऊंट क्लिअर? म्हणजे?

हसून, ॲकांऊट नाही रे, अकाऊंट... म्हणजे.... अं..... म्हणजे प्लस आणि मायनस. सगळे प्लस एकत्र, सगळे मायनस एकत्र, आणि मग बिग जे असेल त्यातून स्मॉल मायनस करणार.... आणि मग जे उरेल ते घेऊन डॅड बाहेर येईल बेटा!

म्हणजे रोज इव्हिनींगमधे ब्रीफकेस घेऊन यायचा तसा?

हो बेटा अगदी तसाच!

---

अरे आज असा का उतरलाय तुझा चेहरा? आण ती ब्रिफकेस दे माझ्याकडे आणि बस बरं तू, पाणी आणते थांब..... अरे काय झालय? किती घट्ट धरलाहेस माझा हात? ए अमोल, सांग ना रे? धीर सुटत चाललाय बघ माझा.

आज रमण ला ऑफिसला येतानाच अपघात झाला शलाका! मेला नाही गं, पण वाटलं मेला असता तर बरं झालं असतं.

अरे असं काय म्हणतोस? मृत्यूपेक्षा आणखी काय वाईट घडू शकतं?

त्याचे दोन्ही पाय मांड्यांपासून तुटले गं! कसलं भयंकर असेल पुढचं जीणं! विचार करकरून मलाच धडकी भरतेय. असलं केविलवाणं, लाजीरवाणं जीणं जगण्यापेक्षा मृत्यू लाख वेळा परवडला !

तू शांत हो बरं जरा. पाणी पी. चहा आणते थांब.

थांब, आधी मी काय सांगतोय ते नीट ऐक, आणि कायम लक्षात ठेव. देव न करो, पण उद्या माझ्यावर ही वेळ आली तर मला मरण द्यायचं. जगवायचं नाही. लक्षात ठेव.

अरे नको रे अभद्र बोलूस काही. ये इकडे असा. ठेव डोकं माझ्या मांडीवर आणि शांत पडून रहा.

हो, तेच करणाराय, मगच जरा बरं वाटेल मला. पण आधी मला वचन दे, आत्ता मी जे सांगितलय ते लक्षात ठेवशील आणि तसंच करशील.

बरं बाबा, ठेवेन मी लक्षात! आता ये बरं असा जवळ! काय दशा झालीय बघ एका दिवसात.

---

ममा, ममा, ... ममा..... कुठे अशी बघतेस आभाळात?

(दचकून) हं... हो बोल बेटा... डॅडला आठवत होते.

मला भूक लागलीय गं! कधी येणार डॅडा बाहेर? इतकी सारी सम्स म्हणून वेळ लागतोय का गं?

हो बेटा! थांब हं, भूक लागलीय ना, बर्गर आणि आईस्क्रीम देते तुला. बट ओन्ली फॉर टुडे!

ओके ममा!

---

डॉक्टर, काहीही काय सांगताय ? दोन्ही पाय? अहो असं कसं जगेल तो? काहीतरी करा एक पाय तरी?

असू दे, जीव वाचेल ना? बास झालं मग. मी सांभाळेन माझ्या मुलाला कसाही असला तरी. माझ्या ताब्यात राहील माझा पोर. त्या सटवाईने इतकी वर्ष ताटातूट केली आम्हा मायलेकरांची.

वहिनी, काहीतरी नका बोलू. तिची कधीच ना नव्हती. तुमच्या सगळया अटी मान्य करून येऊन राहायला तयार होती तुमच्या सोबत.

तुम्ही मात्र तू एकटाच ये म्हणून हटून बसलात आणि अमोलला ते मान्य नव्हतं.

का माझ्या दु:खावर डागण्या देताय वन्सं? माझा मुलगा जरा आता कुठे मृत्युच्या दाढेतून बाहेर येतोय आणि तुम्ही या अशा डागण्या द्यायच्या!

---

चंदू, क्या किया? गिराया ना ऑर्डरका बर्गर? कौन रख्खा रे तेरेको नौकारीपर? अब ये खर्चा क्या तेरा बाप भरेगा?

गलती हो गयी साब, कुछ समजाही नही, कैसे गिरा हाथ से.

---

अर्चू, कशी गं अशी वेंधळी, पाडलस सगळं आईस्क्रिम हातातून खाली? हं....., रडू नकोय लगेच यायला.... दे रे बाबा दुसरं.... हं, घ्या, नीट धर आता.

---

डॉक्टर किती दिवस अजून ठेवावं लागेल या नळयांवर? अजून म्हणावा तसं ओळखतही नाही हो.

या नळया आहेत म्हणून जीवंत आहे तुमचा मुलगा. एक जरी नळी निघाली तरी जीवावर बेतेल. किती दिवस ते नाही सांगता येणार पण गरज नसेल तेव्हा आम्हीच काढू.

हं! बरं!

काय होणार हो आपल्या अमोलचं?

तुझ्यामाझ्या कर्माची फळं तो भोगतोय बरं वासंती.

काहीबाही बोलू नका. ऐकेल कोणी.

कोणी ऐको न ऐको, आपल्याला आपले आवाज ऐकू येणारच गं! तू एक पहिल्यापासूनच उलट्या काळजाची. पण मी का असा अमानवी वागलो त्या दिवशी? त्या अश्राप पोराबरोबर तरी... परमेश्वरा.... माझ्या गुन्ह्यांची शिक्षा माझ्या पोराला नको रे देऊस.

---

ममा.... ती बघ ती ओल्ड् ऑन्टी..... डॅडला घेऊन जाणारी.... ती डॅडच्या ऑफिस मधे काय करतेय? ती परत डॅडला घेऊन जाणार??

नाही बेटा! यावेळेस डॅड आपल्याबरोबरच येणार. आय प्रॉमिस!

येस्स्स्स! माय ममा इज द बेस्टेस्ट! किस्सी ममा!

हाहाहा! आज ममाला न मागता किस्सी? क्या बात है?

ममा, यु नो व्हॉट? ही ऑंटी जेव्हा डॅडला घेऊन गेली ना कारमधून उचलून, आय वॊज होल्डींग डॅडस् बेल्ट, तिने माझा हात झट्कून टाकला.... मला इतकं पेन झालं ममा, आणि तिने झटकला ना ममा, तर माझा हात अर्धा खालीच आला एकदम... आय वॊज अनेबल टू होल्ड इट अप ममा....

डोन्ट क्राय माय चाईल्ड! आता नाही ना पेन? ऑल पेन गॉन राईट? माझं पण संपलं बेटा सगळं पेन. नाऊ वी आर् फ्री ऑफ एनी पेन अँड वी विल मेक डॅड फ्रि ऑफ ऑल द पेन बेटा! व्हेरी सून!

आय ॲम जस्ट वेटींग फॉर द राईट टाईम.

---

अहो, अहो, ती बघा.... ती सटवी.... शलाका आणि तिचं ते पोरटं.... अमोलच्या रुम मधे जातायत.... ती बघा कशी पहातेय.... आई.... गं.... अहो.....

अगं, उठ, जागी हो, स्वप्न पडलं तुला, बसल्या बसल्या झोप लागली का? अगं... ए.... काय होतय तुला? डोळे का फिरवलेस? डॉक्टर.... नर्स...... हेल्प.... हेल्प....

क्या हुआ अंकल? हटो... देखने दो.... ऑन्टी.... आँखे खोलो..... बॉय... स्ट्रेचर लाओ जल्दी.... बिपी देखो..... डॉक्टर को फोन किया? अंकलं.... आप शांत रहो... हम देख रहे है ना.... घबराओ नही.....

---

शलाका.... कुठे होतीस गं? माझं काय झालं पाहिलस ना? तुझीच वाट बघत होतो. वचन पाळायचय तुला.... रमण पेक्षाही भयंकर अवस्था आहे ही.... चल लवकर कर काहीतरी.... तुच करू शकशील.... डॉक्टरना सांगून काही उपयोग नाही.

मला माहित आहे, मी खूप स्वार्थी आहे. तुम्हा दोघांचा काहीच विचार नाही. पण जीवंत राहूनही मी बोझच बनणार ना? विचार कर.

अमोल, माझ्या राजा... आता काही बोलू नकोस... तुला सोडवणार आहेच मी, आणि आपण बरोबरच राहणार तिघें... निदान काही काळ तरी... पिल्लू खूप मिस करतय तुला. पण त्याला नंतर भेट. आधी तुझी या वेदनामय शरीरातून सुटका तर करू देत.

हं, ही निघाली सलाईन ची नळी, ही..., ही........, ही शेवटची ऑक्सीजनची.... चला झालं....... काही सेकंद आणि संपतील सर्व वेदना.

हाहाहा.... शालू..... माय एन्जेल...... येस आय ॲम फ्री बेबी.... थँक यू....

शोना....... डॅड......

शालू.... आठवतय तुला आपण म्हणायचो ती ईन्शुरन्स कंपनी ची टॅगलाईन.... गमतीने.... जिंदगी के साथ भी और जिंदगी के बाद भी..... हाहाहा.....

# झिलू

गाडीने शेवटचे वळण घेतले, एकदाची घरासमोर थांबली आणि स्वप्नाच्या नवऱ्याने सुटकेचा निश्वास सोडला. आयुष्यात प्रथमच कोकणात येत होता, ते ही लग्नानंतर प्रथमच, आजेसासरी! विमानाने गोव्यात जाऊन, निवांत चार दिवस राहून, आता दोघे जण, कारने, स्वप्नाच्या आजोळी आले होते. इनमिन दोन तासांचा प्रवास, पण वळणा वळणाच्या रस्त्याने जावई बापू इतके हैराण झाले की रस्त्यात पसरलेली हिरवीगार रेशमी हिरवळही त्याचे मनोरंजन करू शकली नाही. स्वप्ना मात्र लहान मुलासारखी हरखली होती. इतर वेळी बऱ्यापैकी शांत स्वभावाच्या, आपल्या एक वर्ष नव्या बायकोचे, हे आगळे रुप मात्र तो विस्मयाने पाहत राहिला.

स्वप्ना जणू परत १० वर्षाची चिमुरडी झाली होती. आपल्या वर निरतिशय प्रेम करणाऱ्या या निर्मळ मनाच्या आप्तांमधे येऊन मधली सारी वर्ष जणू नाहिशीच झाली होती. गाडी जसजशी गावाच्या जवळ येऊ लागली तेव्हा पासूनच हिची उत्तेजना वाढत चालली होती. रस्त्यावरच्या जुन्या खुणा नव्याने पहाताना मोठ्या उत्साहाने नवऱ्याला सांगत राहिली. वेशीवरच्या मारूतीचे देऊळ, आणि त्याच्या जवळच महाकाय पिंपळाखालच्या मुंजाची समाधी. तिला आठवलं, पूर्वी एस् टी बसचे ड्रायव्हर, कंडक्टर, उतरून मुंजाला नारळ ठेवत आणि मगच गाडी वेस ओलांडायची. असं नाही केलं तर, गाडीला अपघात होतो, असा दृढ विश्वास होता.

येताना पाहिलं, तेव्हा मारूतीचं मंदिर होतं पण ना पिंपळ होता, ना त्याखालची समाधी. त्या जागी, कोणत्या तरी सरकारी ऑफिसची इमारत दिसली. मामाला गेल्यावर विचारायला हवं, स्वप्ना मनात म्हणाली. एक ना अनेक आठवणी. बराचसा भाग न ओळखू येण्याइतका बदलला होता. पुर्वीची बैठी, चिऱ्याच्या लाल भिंतींची कौलारू घरं, त्या भोवतीच्या नारळी पोफळीच्या बागा, प्रत्येक दारात फुलांनी बहरलेली जास्वंद, अनंत कर्दळ, सोनटक्का यांची झुडपं, बहुतेक घरांना वर चढून जायला पायऱ्या, यांची जागा आता उंच उंच इमारतींनी घेतली

होती. शहराची हवा स्वप्नाच्या या स्वप्नील गावालाही लागली होती. नकळत स्वप्नाचं मन जरा खट्टू झालं. आपल्याला इतक्या जुन्या गोष्टी आठवणीत आहेत याचंच तिला नवल वाटलं. चौथीच्या परीक्षेनंतर गाव सोडून गेली, ती परत आलीच नाही इकडे. अगदी आजी वारली तेव्हाही.

मंडळी घरात आली. जेवणं झाली. पहिल्यांदाच आलेल्या नातजावयाला मामीने खास कोकणातली मेजवानी, तांदळाच्या उकडीच्या शेवया, नारळाच्या दुधाबरोबर आग्रह करकरून वाढल्या. परिणामी जावई बापूंचे डोळे जडावले व पहाता पहाता तो निद्रेच्या अधीन झाला. स्वप्नाला मात्र काही केल्या झोप येईना. ती हळूच पायात चपला अडकवून घराबाहेर पडली. नकळत पाय शाळेकडे वळले. बघता बघता शाळेसमोर येऊन उभी राहिली. हळूच आत शिरली. आता शाळाही बदलली होती. वर्गात डेस्क, बेंचेस आले होते. जमिनी ला टाईल्स बसवल्या होत्या. पूर्वी दर शनिवारी अर्ध्या सुट्टीनंतर मुलं शेण गोळा करून आणायची, आणि मोठ्या वर्गातल्या मुली जमीन सारवायच्या. हिच्या सारख्या लहान मुलींना पाणी घालायचे काम असे. मग बाई मस्त रांगोळी घालत. काय मज्जा यायची.

तिला अचानक शाळेचा पहिला दिवस आठवला. म्हणजे खऱ्या अर्थाने पहिला. त्यापूर्वी अनेकदा मामा, मावशी, आजोबा यांनी तिला शाळेत पाठवण्याचा प्रयत्न केला होता, पण ही त्यांचा हात धरून जायची आणि त्याच पावली परत यायची. मग एकदा तिचे बाबा आले नोकरीच्या ठिकाणाहून, हिला शाळेत पोहोचवायला आले, वर्गापर्यंत सोडून परत निघाले, ही पण मागे येऊ लागली, तेव्हा नुसते डोळे मोठे करून "स्वप्ना" एवढंच म्हणाले, आणि ही गप्प वर्गात जाऊन बसली. पुढे यावरून तिची सगळे यथेच्छ चेष्टा करायचे. तिला मनोमन हसू आलं आठवून.

मग शाळेतून बाहेर पडताना, शाळेच्या वॉशरूम्स दिसल्या आणि चट्कन हिची नजर शाळेसमोरच्या टेकडीवर गेली. पूर्वी ही टेकडी खास मुलींसाठीची वॉशरूम म्हणून वापरात

यायची. मुलांना तिथे जायला मज्जाव होता. मधल्या सुट्टीत सगळया मुली गटागटाने पायऱ्या चढून वर जायच्या. वर भरपूर सागाची झाडं होती. पावसाळयात सागाची पानं खाली पडत आणि त्यावर पाणी पडलं की रक्ता सारखं लाल व्हायचं पाणी. आता मात्र पायऱ्या नव्हत्याच वर जायला. जरा मान वर करून पाहिलं, तर काही बांधकाम सुरू होतं तिथही. पलिकडच्या बाजूने रस्ता केला असावा.

हळू हळू स्वप्ना घराकडे निघाली. जाताना रस्त्याच्या कडेला गडग्यातून तेरडा, नेचा डोकावत होते. तिला खुणावत होते. कशाची तरी, कोणाची तरी आठवण करून देण्याचा प्रयत्न करत होते. स्वप्ना रस्त्याच्या टोकाला आली. इथून दोन रस्ते फुटत होते. एक तिच्या आजोळच्या घराकडे आणि एक रानाकडे. गडग्यावर हात ठेवून उभी असताना अचानक हाताला हालचाल जाणवली, तिने झट्कन हात मागे घेतला.

ती एकदम कित्येक वर्ष मागे पोहोचली.

स्वप्नाने झट्कन हात मागे घेतला आणि फ्रॉकवर पुसला, सगळी मुलं तिच्या घाबरटपणावर खिदीखिदी हसू लागली. स्वप्ना रडवेली झाली. गडग्यातून खेकडा डोकावत होता. तितक्यात झिलू पट्कन पुढे आला, गडग्यात एक जाडसर काठी घुसवून त्याने खेकड्याला अलगद बाहेर काढला, दोन बोटात पकडला आणि सगळया मुलांजवळ नेऊ लागला. आता हसणारी पोरं घाबरून पळू लागली. स्वप्नाच्या चेहऱ्यावर बालीश हसू उमटलं आणि मग, झिलूच्याही.

झिलू, काळा तजेलदार रंग, हडकुळी उंचसर काटक अंगकाठी, पण पटकन लक्षात यायचे ते त्याचे काळेभोर डोळे. वय साधारण स्वप्नाएवढच असेल. स्वप्नाने त्याला यापूर्वी "धर्म्या" बरोबर घरी आलेला पाहिला होता. धर्म्या, महिन्या दोन महिन्याने येऊन माडावरचे नारळ उतरव, आवारातलं गवत काढ, विहीरीत पडलेले नारळ काढ, लाकडं फोडून ठेव, नारळ सोलून ठेव अशी विविध प्रकारची कामं करायचा. त्याला या कामाचा काही मोबदला मिळत असे आणि कामं झाली की आजी त्याच्यासाठी चहा बनवी, आणि झाडाच्या पानावर नुकतेच गिरणीतून

फोडून आणलेले कच्चे जाड पोहे देई. धर्म्या आणि झिलू तो गोड चहा आणि त्या बरोबर पोहे अमृताच्या चवीने खात. मग दोघे बाप लेक निघून जात. स्वप्ना वरच्या माडीवरून हे दृश्य नेहमी पाही. पण हाच धर्म्या, श्रावण अमावास्येला ढोल बडवत यायचा, आणि सर्व गावात फिरून, मग स्मशानात जायचा, तेव्हा तो प्रचंड दारू प्यालेला असे, तोंडाने भयंकर आवाज काढत ओरडत जाई. सर्व पितरांना तो परत सोडून येतो असा समज होता. त्याचे ते भयंकर रूप त्याच्या इतर वेळच्या गरीब व्यक्तिमत्वाशी पूर्ण विसंगत असे. नेहमी आजीला "चाय वाढ गे माये" म्हणणारा गरीब धर्म्या तो हाच, यावर विश्वास बसणे शक्य नसे!

त्या दिवशी प्रथमच झिलू शाळेजवळ दिसला, मुलांची गम्मत करून दिसेनासाही झाला. मग एक दिवस पावसाळ्यात स्वप्ना, रस्त्याच्या कडेला शेवाळं साचलं होतं, त्यावरून घसरली, गुडघा फुटला, रडत, रडत घरी आली. दुसऱ्या दिवशी शाळेपर्यंतच्या रस्त्याच्या कडेचे सगळे शेवाळे, कोणीतरी दगडाने घासून, घासून, साफ केले होते. स्वप्नाला अनंताची फुले फार प्रिय. कोकणात त्याला चटकचांदणी असंही म्हणतात. एकदा शाळेच्या रस्त्यावरच्या, उंच झुडपातून, फुल तोडण्याचा प्रयत्न स्वप्नाने केला पण हात काही पोहोचला नाही. मग नाद सोडून शाळेत गेली. परत येताना त्या झुडपातली सर्व फुलं काढून, झाडाच्या पानावर ठेवलेली होती. आणि मग रोज तिला बहर संपेपर्यंत ती फुलं मिळत राहिली, कधी घराच्या गडग्यावर, कधी रस्त्यावरच्या झुडपाजवळ. एकदा शाळेला एकटीच निघाली असताना, काही भटकी कुत्री अंगावर आली. ही घाबरून पळत सुटली, तर एक, पार फर्लांगभर मागे पळत आलं. घाबरून स्वप्नाची पाचावर धारण बसली. पण तेवढ्यात कुठूनसा झिलू आला, त्या कुत्र्याला हाकलून गेला. यानंतर मात्र, स्वप्नाच्या शाळेला जाण्याच्या वेळेस, झिलू अधून मधून, रस्त्यावर ओझरता दिसायचा, पण ओझरताच. कुठल्या तरी कोपऱ्यावर दिसला म्हणेस्तोवर नाहीसा व्हायचा. कधी झाडांवरून उड्या मारत पटकन समोर यायचा, आणि पटकन नाहीसा ही व्हायचा.पहाता पहाता स्वप्नाची चौथीची परीक्षा झाली. तिच्या बाबानी, परदेशात नोकरी स्विकारली. आता तिची आईही,

नोकरी सोडून बाबांच्या बरोबर परदेशी जाणार होती. तीन ठिकाणी विखुरलेले कुटूंब, आता परत एकत्र येणार होते. आई बाबांच्या बरोबर, नव्या मोठ्या शहरात, मोठ्या शाळेत जायचं, याने स्वप्ना हरखून गेली. काहीच दिवसात आई येऊन स्वप्नाला घेऊन गेली.

सगळे पोहोचवायला दारापर्यंत आले. आजी, मामा, मामी, सगळयांचे डोळे पाणावले. फाटकाच्या बाहेर, आणखी एक, काळीभोर डोळयांची जोडी पाणावली. स्वप्नाला या कशाचाच मागमूस नव्हता.

पण आज मात्र आठवणींच्या लडींवर लडी उलगडत होत्या. कुठे असेल आता झिलू? बराच उशीर झाला होता. घरी सगळे काळजीत असतील. स्वप्ना लगबगीने निघाली. अचानक रस्त्यात गडग्यावर झाडाच्या पानावर अनंताची फुलं ठेवलेली दिसली. स्वप्ना दचकलीच एकदम. आसपास बघू लागली पण रस्त्यावर तिच्याशिवाय कोणीच नव्हतं. ती भराभर घराकडे निघाली.

घरी सगळे वाटच पहात होते. "अगं स्वप्ने, कुठे म्हणून गेलीस म्हणायचे?" तिन्हीसांजेला अशी एकटी दुकटी फिरू नकोस बरं बाळा, " मामीने प्रेमळ समजावले.

स्वप्नाने मान हलवली. नवरा जरा कावरा बावराच झालेला दिसला. मग स्वप्ना म्हणाली, उद्या आपण जाऊ फिरायला. तुम्हाला गाव दाखवते आमचा फिरून. आज शाळेकडे जाऊन आले. दुसऱ्या दिवशी नवऱ्याला घेऊन बाहेर पडली. बाहेरच गडग्यावर अनंताची फुलं मिळाली. स्वप्ना परत आसपास शोधू लागली. आज तिला झिलूचा शोध घ्यायचाच होता. आज त्या डोंगरावरच जाऊ, तिथे काही ना काही माहिती मिळेलच.

अर्ध्या रस्त्यावर पोहोचले तेवढ्यात एक कोकणी बाई, नऊवारी चापून चोपून नेसलेली, अंबाडा, त्यावर अनंताचं फुल, कपाळावर मोठं कुंकू, डोक्यावर भाजीची टोपली, निघालेली दिसली. हिलाच विचारावं का? तेवढ्यात तिच म्हणाली, "भाजी घेतस काय गे? खय रव्हतय? हयसर नवा काय गे?" मग जरा जवळ येवून निरखून पाहू लागली. "अगो जोशांची नात

मगो तू? ह्यो घोव काय गो तुजो? अगे बाये माज्या...... कधी इलस? माका वळखाक नाय? अगो मी कावलीणीचा चेडू. माझी आऊस येवची ती काय, तुझ्या आजीकडे कामाक. आठवता काय तुका? मी शीता, आईवांगडा येवचय मी." स्वप्नाला धूसर आठवली सीता, हिच्याहून थोडी मोठी, कधी कधी यायची खरी आईबरोबर. हिला विचारावं का? तितक्यात सीताच म्हणाली "झिलू बडबडात होतो, सपना ईली, सपना ईली, पण मी म्हनलय येड्याच्या बोलण्यावर काय ईस्वास ठेवचो? तो रोजच सपना, सपना, करत ऱ्हवता. याड लागला नाय तेका, बापूस वारल्यावर येकदाच अमावाश्येक स्मशानात गेलो, बापड्याक येडा केल्यानी त्या पितरानी." स्वप्ना मट्कन खालीच बसली. नवरा नुसता पहात राहीला. त्याला काहीच अर्थबोध होत नव्हता. थोड्या वेळाने त्याने बळेच हाताला धरून स्वप्नाला घरी आणले. पण यावेळी ती झिलूला असे सोडणार नव्हती. दुसऱ्या दिवशी मामाला तिने सर्व हकिगत सांगितली. झिलूला घेऊन येण्यास माणूस पाठवला, पण हा वेडा पीर भेटणार कुठे? नवऱ्याने हळूहळू हिच्याकडून माहिती काढून घेतली. मग दुसऱ्या दिवशी सकाळीच म्हणाला, चल माझ्याबरोबर. तिला घेऊन झिलूच्या घरी गेला.

घर कसलं ते, पार मोडकळीला आलेली झोपडी. झिलू आत बसला होता. "सपना ईली "चा जप तोंडाने सुरू होता. चुलीजवळ एक विशीची मुलगी काही रांधत होती. स्वप्ना व तिचा नवरा, झोपडीच्या नसलेल्या दारात उभे राहीले, ती मुलगी प्रथम दचकली, मग म्हणाली, "अवो बगा तरी कोण इला, तुमची मैतरीण सपना इली." झिलूने नजर वर करून बघितले, जरासं हसला आणि परत "सपना ईली" चा जप सुरू केला. ती मुलगी कसंनुसं हसली. मग म्हणाली "बरे असतत कदीकदी, मगे कामधंदो करून पैशे आणतत, आणि याड शिरला डोक्यात की मग ह्या असा करतत. तुमी लावान घेव नका मनाक, मी आसय नाय, सोडूचय नाय त्यांका एकटो. "स्वप्नाच्या नवऱ्याने तिला बाहेर बोलावले, काही पैसे तिच्या हाती ठेवले, दर महिन्यात मामांकडून घेऊन जाण्यास बजावले. मग म्हणाला, "तुमच्या हक्काचे आहेत ते, घे. माझ्या बायकोचे लहानपणी एवढे रक्षण तुझ्या नवऱ्याने केले म्हणून आज मला ती मिळालीय. त्याचा नीट उपचार कर आणि बरे कर

त्याला. आणि सांग त्याला, म्हणावं त्याची बालमैत्रीण येईल त्याला भेटायला परत. " स्वप्नाने भरल्या नजरेने एकदा झिलूकडे आणि मग आपल्या नवऱ्याकडे पाहीलं. ‘असं कोणतं पुण्य केलं होतं म्हणून ही माणसं माझ्या आयुष्यात आहेत?’ स्वप्ना मनात म्हणाली.

# सावी

सावीनं इटांचं घमिलं उचाललं नि डोस्क्यावर ठिवलं. पार सातव्या मजल्यावरच्या गवंड्यासंगं आज मुकादमानं तिची डुटी लावली व्हती. सकाळधरनं धावी खेप व्हती. सावी अर्दवट बांधलल्या जिन्यावरनं निगाली. सळया भाईर डोकवत व्हत्या जागजागी, जपून जाया हवं, ह्ये लुगडं फाटलं तर दुसरं धडकं लुगडं न्हाय उरलं. उनानं काह्यली व्हाय लागलंली अंगाची. घामानं आंग पार भिजल्यालं. पर पदर जरा सरकायची सूय नव्हती. तो मुकादम लांडग्यावानी नदर धरून व्हता कवाधरनं. आत्ती म्हनती त्येच खरं, गरीबाघरची सुंद्री न् आफत की बोरी! ह्ये रूपच घात करल येक दिवस. ती तरातरा निगली जिन्यावर. चवत्या मजल्यावर योक खिळा खस्कन घुसला पायात आन् सावी चं घमिलं निसाटलच डोस्क्यावरून. पाय दाबून बसकणच मारली खाली. मजल्यावरच्या बाया आल्या आवाजानं धावून. येकीनं खिळा काडला वडून, गवंड्याच्या तंबाकूच्या डबीतून चूना भरला जकमेत आन् हिच्याच डोस्क्यावरच्या फटकुराची चिंदी दिली बांदून पायाला. आगं जपून चालाचं की जरा. बस जरा, मी दिवून येतो ह्ये वझं तवर. नरसम्मा नं घमिलं उचिललं, न गेली वर. बायांनी पानी पाजलं न् गेल्या कामाला. कुनालाच थांबून जमाचं न्हाय हीथं. परतेकाचं प्वाट तेच्या हातावरच. सावी ततच टेकली जरा प्यीलरला. शंकऱ्या व्हता तवर रानीसारकी ठेवल्याली आपल्याला. पर आपलंच नशीब द्वाड, तेला कोन काय करावं. तेला जाऊन बी दोन वरस जाली आता. तवा धाकला बिरप्पा तान्हाच व्हता अजून आन् व्यंका दोन वरसाचा. आत्ती नसती तर जीवच दिला असता आपून. पर तिनं सावरलं म्हन इतवर रेटलं. सावीनं पाय टेकवून पाह्युला. रगात थांबलं हुतं पर कळ पार डोस्क्यात जात व्हती. तसच उटली अन लंगडत खाली आली. हिला लंगडताना बगून मुकादम लगीच फुडं जाला. पर हिनं हात झटकून घमिलं उचाललं, सर्व्या बायां बाप्या समुर काय बोलला न्हाय पर खवचट हासला. सावीला बगूनच शिसारी आली. ती दुकनं इसरून तरा तरा निगाली, ह्या घान नदरंच्या काट्याफुडं त्यो खीळा लय यळा परवडला आसता तिला. सावीची आय वारली तवा सात वरसाची व्हती सावी.

बापानं दुसरी सोयरीक ठरावली तशी आत्ती म्हनली का धाकली दोगं ऱ्हाव द्या तुमास्नी, ही पोर मला द्ये. मोटी झाली का सून करून घीन हिला तवर माजी पोरीची हौस भागल. तवापास्न आत्तीच तिची आय झाली. संकऱ्यासंग येळेवारी लगीन बी झालं. नदर लागावं आसं नसीब हाय आपलं असं वाटाचं सावीला. न छळनारी मायवानी सासू. आन् जीव लावनारा घरधनी. दोन सोन्यासारकी पोरं बी जाली. आनिक काय मागावं कोनी. पर नदर लागलीच. हितच बांधकामावर लिप्ट मंदी अडकून संकऱ्या ग्येला. खास गवंडी व्हता त्यो मर्जीतला. कंत्राटदारानं नुस्कान भरपाय दिली म्हनायला, पर त्यानं कोनचं नुस्कान भरून याय लागलवतं? हिला काम बी दिलं. तवापासनं सावी राबाय लागली.

पयल्या दिशीच आत्तीनं समजावलं. आजपात्तूर माज्या पदरा खाली सुकरुप व्हतीस, हाडात बळ आसतं तर तुला घराबाहीर पडू नसतं दिलं पोरी, पर त्यो कंतराटवाला मला म्हातारीला कामावर घेयाला तयार न्हाय, पदरी दोन पोरं हाईत तुज्या. पर हमिशा हुश्शार ऱ्हायचं. दादल्या बीना बाय म्हनजी यांना लायसन मिळतय जनू. पर तू बाया बाप्यांबरूबर ऱ्हा. येकटी जावयेव नगस. पोरांना सांबाळायला मी हायेच हीतं घरी. पर तू सोत्ताला सांबाळ. हे अवगड दिस बी जातील बग.

सावी आत्तीच्या साथीने सावरली पर ह्ये रोजचं लांडग्यांपासून वाचवित ऱ्हानं सोपं न्हवतं. दिस कसा बी जायचा रात खाया उटायची. संकऱ्याची आटवन जाता जायची न्हाय. वरून उद्याची चिंता जीवाला खायची ती येगळीच. तरीबी ही धीरानं निबवत ऱ्हायली व्हती. सकालधरनं पाय लयच ठनकत व्हता पर कामावर जायालाच हवं होतं. रोजी बुडून कसं जमनार. सावी बांधकामावर ग्येली. कंतराटदार आज आला व्हता. त्यो बोलला नावं पुकारतो तेनी येका बाजूला यावं. मन्सूर चाचा, गंगी, रकमा, आरं द्येवा, ह्यो तर म्हातारे कोतारे, पोटुशा बाया येगळया कराय लागलाय, माज्या पायाचं कळलं तर मला बी काडल, असं मनात येतय तवर त्यो

बोललाच सावी. मुकादम मुडद्यानं चुगली क्येली वाटतय. आरं माज्या द्येवा, आता ह्ये काय नवी आफत आनलीस बाबा? ह्या समद्यानी उद्याच्याला नव्या शाईटवर जायाचं हाय. आज टरक हुभारलाय त्येत बसा समदी, त्यो शाईटवर सोडल तुमास्नी, उद्या तुमचं तुमी यायचय काय? चला, म्हंजी काम तर न्हाय सुटल्यालं, भगवंताची किरपाच म्हनायची. समदी टरकात चडली. मुकादम लांबून बगत व्हता हात चोळत. तिला जरा सुटल्या सारकं वाटलं. शाईट वर पोचली समदी. उतरून पाह्यलं तर ही शाईट घराच्या जवळच निगाली. आता भाकर खाया घरला बी जाती यील कदी मदी. सावीचं तोंड उजळलं. लय दिसांत पयल्यांदाच कायतरी बरं व्हाया लागलं हुतं.

त्या दिशी पयल्यांदी सावी घरला जाऊन आत्तीपाशी बसली. तिला सगळं सांगीत ऱ्हायली. आत्तीलाबी हुरूप वाटला. पोर सावराय लागली. दुसऱ्या दिशी शाईटवर नवा मुकादम आला. हजेरी ला बसला. येकेकाला समोर बोलवून हजेरी मांडू लागला. रकमा पोटूशी हाय तर तिला वाळू चाळाया जिमिनीवरच ऱ्हाव द्या म्हनाला. मन्सूर चाचाला शेवटाल्या मजल्यावरचं काम व्हतं तर लिफ्ट नं जा म्हनला. सावी हाजरीला फुडं आली. मुकादमानं नाव ईचाराया मान वर केली तर बगतच ऱ्हायला. सावी दोन पावलं मागं सराकली तसा भानावर आल्यागत पून्ना कागदाकडं बगून लिवाय लागला. तिला मन्सूर चाचासंग वरचा मजला मिळला तसा तिचा जीव निवला. घरला जशी आत्ती तसा हिथं मन्सूर चाचा व्हता.

सगळी आपापल्या कामाला लागली. सांचाला पगार वाटपाला तिनं पाह्यलं सकाळचा मुकादम कुटं दिसला न्हाय. मन्सूर चाचाकडं समद्यांचा पैका दिवून दुपारच्यालाच गेला म्हनं. आता पाय बी दुकायचा ऱ्हायला व्हता. आल्यावर आत्तीला सांगत बसली समदं नव्या शाईटचं पर त्या नव्या मुकादमाचं काय बोलली न्हाय. रातच्याला डोळं मिटल्यावर त्येची ती नदर येवून ऱ्हायली डोळयाफुडं पन शिसारी न्हाय आली तेची.

मंग नव्या शाईटचं काम लय जोशात सुरू जालं. स्लॅब पडायचा दिस आला तसा सर्व्यांच्यात लय उत्साव आला. रात दिन काम चाललं. सर्व्यांना दोन दिस शाईटवरच जेवन

मिळनार व्हतं. आन स्लॅब संपाय दिशी वशाट बी आन् ग्वाडाचं बी. सावी बोलली आत्ती आज पोरास्नी घिवून शाईटलाच ये. पोरं बी खातील चार घास.आत्ती बी म्हनली व्हय आनते, नजिकच तर हाय यीवू रमत गमत.

सांच्यालाच आली आत्ती. सावी आन् बाकीचे वरच व्हते स्लॅब भरीत, खाली रकमा, आत्ती आन् अजून दोन चार बाया पोरं सोरं बसल्याली. तवाच मुकादम आला आन् पोरांना बगून म्हनला का चला लगोरी खेळू. पोरं बी झाली का तयार लगीच. मंग जेवन व्हतय तयार तवर यांचा लगोरी रंगला. स्लॅबवाले सगळे आंगुळ कराय गेले, बाया येकीकडं आन् बापे येकीकडं. सावी न्हावून आली भाईर आन् बगते तर पोरं मुकादमासंग लईच खुशीत आलंली. बगतच ऱ्हायली. धाकला बिरप्पा तर तेच्या पार खांद्यावर जाऊन बसला व्हता. ती चट्कन फुडं जाली, म्हनली बिरू खाली उतर, मुकादमानं तेला आनून हिच्या हातात दिला, देताना नदर भिडली दोगांची. रातच्याला चौगं घरी आली. आत्ती नी पोरं लय खुशित व्हती. लय दिसांनी घर हासत व्हतं.

रातच्याला परत सावीला त्येची नदर आटवली, आटवत ऱ्हायली. दुसऱ्या दिसापासून सावी कामावर आली की तिची नदर मुकादमाला शोदू लागली. कदीमदी त्यो पोरांची, आत्तीची ईचारपूस करू लागला. त्याकारनानं दोगं चार सबूद बोलू लागली.

रातच्याला सावीला सदा त्येची याद सतवाय लागली पर ते सतावनं बी तिला ग्वाड लागू लागलं. येकदा सावी शाईटवर पोचाय आन् मुकादम आंगुळ करून भाईर याया येकच गाट पडली. त्येचं त्ये उगडं पिळदार आंग सावी बगतच ऱ्हायली भान हारपून. संकऱ्या गेल्यापासनं पयल्यांदा काळजात कायतरी लक्कन हाललं.

दिसभर सावी यड्यागत जाली. पार हादरून ग्येली. कसंबसं काम संपून घरला आली. आत्ती नं येकाच नदरत वळाकलं का कायतरी बिनसलय. म्हनली पड जरा. म्या थापतो भाकऱ्या मंग खावू समदी. सावी काय बोललीच न्हाय.

जेवनात बी तिचं काय ध्यान लागलं न्हाय. पोरं झोपून गेली. सावी बी हातरूनावर पडली पर डोळाला डोळा लागंना. सारका त्यो उगड्या अंगाचा मुकादम नदरं समोर येवून ऱ्हायला. येकीकडं मन खाय लागलं तिला. श्येवटी उटली आनि आत्तीच्या हातरूनावर पायाशी येवून बसली. तिच्या पायावर डोस्क ठिवून ढसा ढसा रडाय लागली. आत्ती धसकून उटली. सावीला छातीशी घरून थोपटू लागली. पोरी काय जालं ? आगं बोल कायतरी. आत्ती लय पाप जालं माज्याकडून. परतिव्रतीचा धरम सोडला म्या. लय वंगाळ ईचार क्येला. मला माफी नाय मिळाची त्या भगवंताच्या दरबारी. मनाला मोकाट सुटाय दिलं. सरीर बी वंगाळ मागाय लागलं. फकस्त ह्यी बुद्दी ईरोद करून ऱ्हायलीय गं आत्ते. ह्ये धडच नस्त तर लय बरं जालं आस्त बग. संकऱ्यासंगट मी बी जायाला हवी होती. आत्ती नं तिला थोपटलं. मंग म्हनली सावी तुजं नाव सावी म्हनजी सावित्री, परतिवरता. आगं तू मागं ऱ्हावून पोरांना, मला, सांबाळलस ह्येच खरं परतिवरतेचं लक्शन हाय. संकऱ्याच्या संगट जानं लय सोपं व्हतं माजी बाय. धड काय आनि मन काय त्ये जे मागतय त्ये काय चूकिचं न्हाय बाय. सरीराचा धरम हाय. काय बी चूक न्हाय. मुकादम जंन्टलमन हाय. नदर साफ हाय त्येची. तुला मागनी घालाया आला व्हता परवा मन्सूर चाचा संग. बिडी काडीचं नाद नाय त्येला. पोरानाबी बगल चांगला. त्यो बी येकलाच हाय. आजपोतर कदी लगीन कराचा इचारच क्येला न्हवता म्हनला.

आगं दुक आलं वाट्याला तर त्येला बी पिरमानं आपलं म्हनाव, आन् सुक आलं तर त्येलाबी गोंजाराव, बाये. सावी बगतच ऱ्हायली आत्तीच्या तोंडाकडं. आत्तीनं तोंडावर हात फिरिवला, बोटं मोडली कडाकडा, म्हनली सुकी ऱ्हाय माजी बाय!

# गुंता

सुलूला परत अवेळी जाग आली. कशानं आली, कोण जाणे? अलिकडे असंच होतं. पहिले काही तास गाढ झोप आणि मग जाग. येते तीच मुळी एखाद्या विचाराचा हात धरून. आणि मग सुरुच होते मालिका. हातात हात घालून, फेर, नाही फेर नाही, फेराला एक आकार असतो. इथे म्हणजे दोन सुयांवरचं विणकाम. उलट सुलट, सुलट उलट, कधी चार सुलट एक उलट, चार पाच सहा, उलट उलट उलट, अर्रर्र! चुकलं ना सगळं, परत उसवायचं आता, पण उसवलं जातय कुठे? गुंता, गुंता झालाय नुसता.

तिला आवडायचा गुंता सोडवायला. सासूबाई स्वेटर्स विणायच्या पूर्वी भरपूर, पण गुंता झाला की हिच्या हाती. मग अलवार, हलक्या हातांनी, एक एक धाग्याचा माग घेत, अलगद सोडवायची. तंद्रीच लागायची तिची असं करताना. किंचित तोंड उघडं राहातं तिचं असं करताना. जीभ जराशी बाहेर. तरूण होती तेव्हा नवरा म्हणायचा 'सुंदर ते ध्यान'. आता सुईत धागा ओवायचा म्हटलं तरी उघड्या तोंडातून लाळ गळते तिच्या. "अगं, काय ते, ओंगळ दिसतेस, कशाला हवेत उपद्व्याप तुला?" नवरा ओरडतो, सून हसते फिदी फिदी. संतापाचा विचार मूळ धरतो मग. खेचत खेचत पार आत आत गाठी मारत जातो. तेव्हा मात्र आवडायचं तिला, गुंता, तो सुटला; सगळं सुकर, मोकळं झालं, की कसं बरं वाटायचं तिला. क्वचित गाठ बसली असेल धाग्याला तर ती ही अलगद, चिमटीत धागे पकडून, धाग्यांना शाबूत ठेवत, हळू हळू गाठी सोडवत, अखंड धागा जपून मोकळा करावा तर हिनेच.

नात्यांचे धागेही असेच अलवार सोडवत, गाठी न बसता मोकळे ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला तिने. पण हे नात्यांचे धागे सोडवताना, मनाच्या धाग्यांना विचारांच्या टोकांनी खेचत खेचत इतकं गुंतवलं की कधी नीरगाठी बसत गेल्या तिचं तिलाही कळलं नाही. "भास होतात हल्ली. असंबद्ध बोलते ती काहीतरी." मुलीचा बारीक आवाज कानात घुमतोय अजून. कोणाबद्दल बोलत असेल? विचारायला हवं तिला. आपल्याबद्दल की काय? ही तर मुलगी ना आपली? आपल्या पिंडाचा भाग? तिलाही कळू नये?

ती झाली तेव्हा किती हरखून गेली सुलू!

मुलगीच हवी होती तिला. लाडाकोडाने वाढवली. तिनेही सोन्यासारखा आनंद दिला आयुष्यभर. तिचा नवराही सोन्यासारखा. जपतो तिला फुलासारखी. आणि काय हवं? आपल्यालाही जपलीच की फुलासारखी नवऱ्याने. आपणही प्रेम करत राहिलो.

काय असतं प्रेम म्हणजे? वेगवेगळं असतं का? मुलांवर वेगळं, नवऱ्यावर वेगळं, आणि त्याच्यावर? सोनेरी प्रेम केलं त्याच्यावर तर. इंद्रधनुष्यी, त्यानेही, मंतरलेले दिवस होते. मग संपवलं आपणच! संपवता येतं? मनातून कसं संपवायचं? आतआतल्या पेशी पेशी मधे भिनलेलं तर असतं! पण लग्न ठरलं तेव्हा त्याच प्रेमाचं पाप झालं? असं कसं? प्रेमाची जात कुठली पण? असते का जात प्रेमाला? की केळीच्या सोललेल्या गाभ्यासारखं तुकतुकीत सफेद, नुकत्याच खुडलेल्या केवड्याच्या सुगंधी पिवळसर पात्यासारखी निर्मळ निर्लेप, शुद्ध असते प्रेमाची भावना?

मग आपण चढवतो त्यावर नात्यांची झूल? आवरणं? बंदिस्त करतो त्या शुद्ध भावनेला त्या त्या नात्यांच्या कुपित? ती भावनाही अशुद्ध होते का मग? संकुचितही होते का? म्हणजे ममत्व मुलांसाठीच! “प्रेम” नवऱ्यासाठीच. त्यावर आकर्षणाचं पुट चढवलेलं. माया, मैत्री, दया, कणव, किती प्रकार?

डाळीचं पीठ. आजेसासूबाई म्हणायच्या. बाईची जात डाळीच्या पिठासारखी. बेसन म्हणायच्या त्या; पिठलंही होतं, शेवही, लाडूही होतो, मैसूर पाक, ढोकळा, कढीतही तेच जातं. पण जातं ज्यात, तेच होऊन राहातं. वेगळेपण जपण्याचा अट्टाहास नसतो. दाखवा बरं कोणी काढून या पदार्थांमधलं बेसन म्हणून वेगळं? तसं असावं बाईचं! मग समाधान लाभतं. किती खरं होतं. होतं का खरंच? बेसनालाही ना तक्रार होती ना दु:ख! आनंदच होता की. पण, पण नात्यांची गफलत झाली तर? मालूताईची झाली तशी.

सुटीत मुलांना घेऊन राहायला आली. आणि यांच्याच प्रेमात पडली. तिचे यजमान गरीब स्वभावाचे, फार सौम्य. त्यामानाने ‘हे’ जरा जात्याच पुरुषी उग्र. त्याचंच आकर्षण वाटलं असावं बिचारीला. कधी गुंतत गेली कोण जाणे. आपण हे असं सगळयात गुंतलेलो, सासूबाई

अंथरुणावर, रात्र रात्र जागून जायची. एकदा सहज वर गेलो तर, बेडवर.. सर्र्रकन आत्ताही काटा आला तिच्या अंगावर. काही काही व्रण कधीच बरे नाही होत. दुसरे दिवशी आपल्या नजरेनेच मालुताईला सांगितलं असावं सगळं. त्याच दिवशी परत निघाली. हे मात्र, “अहो राहा चार दिवस, विनायकरावांनाही बोलावून घेतो, मग जा” असं साळसुदासारखे बोलले. हातात लाटणं होतं, तेच फेकून मारायची इच्छा झालेली खरंतर. मालुताईला काय वाटलं यांच्याविषयी? प्रेम? आणि यांना? पुटं चढली की बंदिस्त होतं ते असं. नाहीतर त्यांच्या प्रेमाच्या भावनेने माझ्या मनात अशी आग का लागली की ज्यात होळीच झाली सगळयाची? मी तर प्रेम करत होते ना? मग त्यांच्या आनंदाने मला दु:ख, वेदना कशी? गुंता, गुंता नुसता. मालुताई परत फिरकली नाही कधी. चुकून कार्यात एखाद्या भेटलीच तर नजर चुकवायची. त्या पापभिरू बाईला सहन झाला नाही हा मानसिक ताण. अपराधी भावनेनी पोखरून टाकलं तिला. अकाली गेली बिचारी.

आपण का नाही हा गुंता सोडवला? मोकळेपणाने बोललो असतो तिच्याशी, माफी मागायची संधी दिली असती तिला, तर मालुताई जीवंत असती. कदाचित. ऐन चाळीशीत नक्कीच नसती गेली. जर आणि तर. हे दोन शब्द हाकलून काढावेत कोशातून. निरर्थक आहेत. कुचकामी, निरुपयोगी. अगदीच. सदाशिव भावोजींसारखे. खायला काळ नि भुईला भार. जन्मभर धड काही केलं नाही. व्यसनं लावून घेतली मात्र तऱ्हतऱ्हेची. सख्खा भाऊ, पण यांनी जन्मभर कधी जवळ केला नाही. शेवटच्या आजारात आले तेव्हा आपल्यालाच कणव वाटली. यांना म्हटलं राहू देत इथे.

आपली नुकतीच साठी झालेली. भावोजी पण एखादं वर्ष पुढे मागे. सुश्रुषा केली मनापासून आपण, एक मदत म्हणून. पण एक दिवस हात धरलिनी सरळ. हिसडून बाहेर आलो आपण. कितीदा घासरा मारून धुतला तरी मलीन वाटत राहीला तो हात आपल्याला. मग पांडगोबाला लावला त्यांच्या उशाशी. गेले तेव्हा नमस्कारही करावासा नव्हता वाटत. काय होतं त्यांच्या मनात? प्रेम? आकर्षण? पांडोबा म्हणायचा सारखं “वहिनीला बोलव” म्हणायचे भावोजी

शेवटचे काही दिवस. माफी मागायची असेल? का ममत्व वाटलं म्हणून हात धरला असेल? आपणच चुकीचं पुट चढवलं का? मलीनता आपल्या मनात होती की त्यांच्या? कसं कळावं? गाठ नाहीच सुटणार ही कधी. एक टोकच नाहीसं झालं ना? यांना मात्र नाही सांगितलं काहीच आपण. का? त्यांना शेवटच्या दिवसात हाकलून लावलं असतं का यांनी? लावलंही असतं किंवा नसतंही. पुरुषाला पुरुषाची भाषा कळली असती का? हाकून लाऊ नये असं मात्र वाटतच होतं आपल्याला? ते का? मग काय मरत्या माणसाला घराबाहेर काढायचा?

मालुताई एकटीच की आणिही होत्या यांच्या.. अजूनही जळतो आपण या विचाराने? कुडी जळायची वेळ आली तरी?

“अगं कशी करतेय बघ ही “यांचाच आवाज. “अरे या रे कोणी:” “काय झालं बाबा? बरीय हो ती. स्वप्न पडलं असेल काहीतरी तिला. झोपा तुम्ही. उगाच जागेपणी पण बडबडते कधी कधी. माहित नाही का तुम्हाला? उगाच काय घाबरे होता? सकाळी उठून लागतेकी ती रोज तुमच्या सरबराईत. कमी आहे का काही त्यात?”

“अगं, ही गेली तर माझं कसं होणार? भिती वाटते गं.”

“काही होत नाही तिला. जरा असंबद्ध बोलते कधी कधी एवढंच. मालूमावशी, सदा काका, कोण कोण गेलेल्यांची नावं घेते हल्ली सारखी. आता वयानुसार होत असतील भास. तरी मी उद्या बोलावते डॉक्टरांना”

‘भास कसले बाई? पण माझ्या जाण्याची एवढी भिती वाटतेय यांना, म्हणून मला का इतकं बरं वाटतय? गुंता सुटत नाही हेच खरं.’

# दुहेरी

चंद्रू भराभर पायऱ्या चढत आश्रमाकडे निघाला. ध्यानधारणेची वेळ टळून चालली होती. आज घाटावर ती मंडळी उगाच काथ्याकुट करत बसली पोथ्या पुराणांचा. गुरूजी होते बरोबर, मग उठताही येईना! सभा संपल्यावर मात्र चंद्रू काही कारण सांगून निघालाच! त्याने सुरू केलेले प्रयत्न आता लवकरच प्रभाव दाखवणार होते. आता पराकाष्ठा करणं गरजेचं होतं. मधे खंड पडता तर सगळंच मुसळ केरात जाणार होतं. आज छान संधी होती. आश्रमात त्याच्याव्यतिरिक्त कोणीच असणार नव्हतं पहाट पर्यंत. बाकी सारे शिष्य गुरूजींबरोबर होते. किर्तन भजनात सहभागी होऊन सगळे सकाळी परतणार होते. त्याची पावलं अधिकच वेगाने पडू लागली.

आश्रमातील स्वत:च्या कुटीत शिरून त्याने ताटी बंद केली. साधनेच्या पहिल्या सर्व पायऱ्या त्याने केव्हाच पार केल्या होत्या. सिद्धीही हळू हळू त्याच्या पायांशी लीन होत होत्या. आता अंतीम चरणावर त्याची साधना सुरू होती. आपले गुरूजी ठार वेडेच म्हणायला हवे. सर्व सिद्धी प्राप्त असूनही कधीही त्यांचा वापर केला नाही. सर्व शिष्यांना उलट सिद्धी कशा वाईट व अंतीम समाधीवस्थेत त्या कशा अडथळे बनतात हेच सांगत बसतात. बरे तर बरे, त्यांना भ्रमात ठेऊ शकलो आपण आपल्या सद्वर्तनाने! त्यामुळे हातचे राखून न ठेवता सर्व ज्ञान दिले त्यांनी आपल्याला. आता बस शेवटची पायरी, आणि मग आपल्याला कोणाचेच भय उरणार नाही. संपूर्ण जगतात आपली दिगंत किर्ती गाजेल! हं! बस एक शेवटची पराकाष्ठा! जगज्जेते होण्यास तो आतुरला. पण आधी सर्व सराव करायला हवा. मग अंतीम चरण!

चंद्रू आसनावर पद्मासनात बसला. डोळे नासिकाग्र केले. संपूर्ण लक्ष श्वासावर केंद्रित करत त्याने मुखोद्गत मंत्रोच्चारास प्रारंभ केला. प्रथमचरणात त्याने शरीरास असिमित महाकाय करण्यास प्रारंभ केला. प्रसरण होत होत शरीर पार कुटीच्या छतास व भिंतीस भिडले तेव्हा तो थांबला. ही सर्वात पहिली पायरी असणे स्वाभाविकच होते. मनुष्याच्या अहंभावास असिमित वाढणे सर्वात सोपे.

नंतर त्याने पूर्वस्थितीत येत अनेक गोष्टींचा सराव केला.

शरीरातील पंचतत्वांपैकी फक्त एकच तत्वात संपूर्णपणे रुपांतरीत होणे, जसे; जलरुपात तो कुटीभर वाहिला, तर वायुरुपात कुटीत वावटळ बनून गरगर फिरला, अग्नीरुपात कुंडात ज्वाला बनून भडकला तर तेजरुपात कुटी झळाळून उठली! आकाशतत्वात रुपांतरीत होणे मात्र त्याने सद्यस्थितीत टाळले कारण तसे करता बरीच शक्ती नष्ट होती. त्याला सध्या शक्ती गमावून चालणार नव्हते. शून्यवत होणे तसेही कठीणच.

मग त्याने पर-मनं प्रवेशाच्या सरावास सुरुवात केली. आज त्याला यासाठी फार कमी मने उपलब्ध होती. पक्षी, प्राणी, वृक्ष किडे यावरच समाधान मानावे लागणार होते. तसेही यांची मने खुलीच. ताबा घेणे फारच सोपे. तरीही सरावासाठी त्याने एक एक करत परमनं प्रवेश केला आणि उपजत भ्रष्ट बुद्धीमुळे सर्व विपरीत क्रिया करत गेला. संपूर्ण समभावाने जगणाऱ्या त्या निसर्ग संस्थेस विस्कटून गेला. मनुष्य मनाचे बिभत्स रुप नैसर्गिक मनांना हादरवून गेले.

मग सुरू झाला परकाया प्रवेशाचा सराव. यासाठी कुटीतून बाहेर येणे गरजेचे होते. सरडे, किडे, प्राणी, पक्षी, एक एक पडाव पार पडत होता. आता अत्यंत त्वरेने त्याने हे सराव सुरू केले. क्षणाक्षणात तो परकाया बदलत चालला. हा सराव आणीबाणीच्या वेळी कामी येणार होता.

मग तो सरळ गुरूजींच्या कुटीत पोहोचला. मंत्रोच्चाराने सिद्ध केलेल्या कित्येक कुपी तिथे मांडलेल्या होत्या. साधारण चार बोटे लांब, दोन बोटे उंच अशा सिद्ध कुप्या घट्ट झाकणाने

बंद केलेल्या होत्या. काही रिकाम्या कुप्याही होत्या. चंद्रूच्या मनात एक विलक्षण कल्पना तरळली. मग त्याने सावकाश साधनेला सुरवात केली. हळू हळू एकाग्र होत त्याने शरीराला आकुंचित करत नेलं. पहाता पहाता अंगुलीभर उरला. गम्मत करून पहाण्याची हुक्की त्याला गप्प बसवेना. हळूच एका रिकाम्या कुपीत शिरून तो काही काळ पडून राहिला.

तेवढ्यात गुरूजींनी वरून कुपीचे झाकण घट्ट बंद करून टाकले. कुपीवर काही परवलीचे शब्द लिहून ती कुपी सिद्ध कुपींच्या कप्प्यात ठेवता ठेवता एक छद्मी हसू ओठांवर खेळले.

मग म्हणाले चंद्रू, शेवटचा एक धडा राहिला तुला शिकवायचा. सर्वात महत्वाचा धडा असतो संयमाचा! सर्वश्रेष्ठ बनण्यास अत्यावश्यक असतो संयम! जो तू नाहीच कधी शिकलास. कुपीत चंद्रू तडफडला, त्याला हातही हलवणे शक्य नव्हते!

लहानगा शंकू, जो नुकताच आश्रमात रुजू झाला होता आणि गुरुजींच्या पाठोपाठ आश्रमात पोहोचला होता, तो विस्फारित डोळ्यांनी कुटीच्या कवाडातून हे सर्व पहात होता. त्याला त्या कुप्या उघडून पाहण्याची अनिवार इच्छा झाली. गुरूजी जाण्याची वाट पाहत तो लपून बसला!

# कामिनी

शांता सकाळी नेहमीप्रमाणे उठून गोठ्याकडे गेली. वासराचा कासरा सैल करून, कामिनी पुढे चारा टाकला, पाण्याची बादली भरून ती ही समोर ठेवली. दगडू गोठा साफ करून नुकताच गेला असावा. खरं म्हणजे ही कामही दगडू करू शकत होता. इतर गुरांचं तोच करी, पण ही कामिनी लहान पणा पासूनच महा द्वाड. लहान होती तेव्हापासूनच कासरा सोडला की आधी शांतेकडे येवून अंग घासू लागे. शांतेने लाड करावेत, मानेस खाजवावे तेव्हा कुठे बाईसाहेब आईच्या पान्ह्याला तोंड लावत. त्या माऊलीचा पान्हा गळू लागे तोवर. पण ही बया काही शांतेने धरून पान्ह्यापर्यंत नेईपर्यंत प्यायचीच नाही. मोठ्या जाऊबाई नेहमी म्हणत, "शांते, पोरं काय नी गुरं काय, जागीच ठेवावित. डोक्यावर घेशील तर लाथाडतील हे नक्की." पण शांतेला गुरांना काय की पोरांना नाही म्हणणे जमलेच नाही कधी.

आता ही कामिनी गाय, स्वत: आई झाली तरी शांतेशिवाय इतर कोणाला हात लावून द्यायची नाही. चारा पाणी शांतेनेच करावे, धारही तिनेच काढावी. इतरांनी अनेकदा प्रयत्न करून पाहिला आणि कामिनी च्या लाथाही खाल्ल्या. एकदा तर मोठ्या दीरांवरच शिंग उगारले. ते महा संतापी, चक्क जाड राजूने बडवू लागले, शेवटी न राहवून शांता मधे पडली, तिच्या अंगावर ही अनेक फटके पडले तेव्हा कुठे दीर भानावर आले. तेव्हापासून मग शांतेशिवाय कामिनी कडे कोणी जावू नये असा पायंडाच पडला. तिचे वडिल अत्यावस्थ असल्याची तार आली पण तरीही कामिनीमुळे तिला अंत्यदर्शनासही नाही जाता आले. एकतर गाव आडवाटेस, येण्या जाण्याची धड सोय नाही आणि वर हे कामिनी प्रकरण. अंगी ज्वर असो की आणखी काही, शांतेला ऊठून गोठ्यात जावेच लागे. गणूच्या वेळेस नऊ महिने भरत आले तेव्हा मात्र हिच्याच्याने खाली बसून धार काढणे होईना, मग हिने गोठ्यात जाऊन कामिनीस जरा गोंजारावे, हाताने चारा भरवावा, पाणी पाजावे, व मोठ्याने हाकारून दगडूस बोलवावे, प्रथम आचळास पाणी वगैरे लावून द्यावे तेव्हा कुठे दगडूस धार काढू देई. सोयराचे बारा दिवस तर वासराचा कासरा सैलच सोडला तेव्हा

कुठे दगडूकडून चारा पाणी घेतले. धार काढायचे धाडस काही त्याचे झाले नाही. हंबरून हंबरून गोठा डोक्यावर घेई. मग शांतेने बाळंतिणीच्या खोलीतूनच हाकारावे तेव्हा जरा गप होई. गणूस घेवूनच मग शांता गोठ्यात जाई. त्यास मोलकरणीकडे देवून कामिनी चे सारे करी. कामिनीच्या पान्हयालाही मग भरती येई.

गणूच्या आजारपणात मात्र कामिनी फार समजूतदार झाली. गणू वर्ष दीड वर्षाचा असतानाच त्यास ज्वराने ग्रासले. पोट टम्म फुगू लागले. शांतेने अनेक व्रत वैकल्ये केली. नवस सायास केले, अंगारे धुपारेही झाले. जो जे सांगेल ते ते केले. सगळे वैद्य, अगदी विलायती डाक्टरासही बोलावणे गेले. पण कशाचाच उपयोग झाला नाही. दुसरे वर्ष पुरे होण्या आधीच सगळे संपले. गणूचे वडील कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. जाताना संध्याकाळपर्यंत परत येईन म्हणाले. ज्वर वाढतच गेला. शांतेने पोरास मांडीवरचे खाली ठेवलेच नाही. निपचीत पडला होता. वडील आले, त्यांनी मांडीवर घेतले, फक्त याचीच वाट पहात असल्या सारखा गणूने प्राण सोडला. वडीलांनी हंबरडा फोडला. शांतेचे अश्रू जणू आटूनच गेले. आधीच कुस उशीरा उजवली. पहिलंच अपत्य असं काळाने हिरावून नेलं, जाब तरी कोणास मागणार? या काळात मात्र कामिनी गपगुमान दगडूस धार काढू देई. गणूस घेवून गेले आणि शांतेने गोठा गाठला, कामिनीस हात लावल्या बरोबर त्या माऊलीस या माऊलीचे दु:ख समजले जणू. अशी काही हंबरली की शांतेनेही न राहवून हंबरडा फोडला. अख्खं घर हादरून गेलं. वर्षामागून वर्ष गेली. शांतेची कुस पुन्हा उजवलीच नाही. पुतण्या भाचरांना, गाई गुरांना प्रेम लावत राहिली. पाहता पाहता दिवस बदलले. गुरं कमी कमी होत गेली. ना त्यांचे करायला घरात माणसे उरली ना दुधदुभत्याची गरज राहिली. शहराने बऱ्याच जणांना आपल्या नादी लावले. गणूपाठोपाठ त्याच्या वडीलांनीही अंथरूण धरले व काही वर्षात गेले.

कामिनी ही भाकड झाली. पुतण्याने अनेकदा तिस विकण्याचा प्रयत्न केला पण तिची किर्ती जगजाहीर, म्हणून कोणी शेणामुतासाठी फुकट देवू म्हटले, तरी घेईना.

शेवटी एक दूरच्या गावातील शेतकरी तयार झाला असे कानावर आले.

पुतण्या म्हणाला "काकी, तिला नेतील तेव्हा तू समोर येवू नकोस फक्त. बाकी सारे आम्ही बघू." शांतेचे मन भरून आले. आज शेवटचा दिवस. आपल्या हाताने चारा पाणी भरवले. मुके जनावर, पण तिसही कळले असावे. वारंवार हात चाटू लागली. शांतेच्या डोळयातून आसवे गळू लागली. बघता बघता तो माणूस येण्याची वेळ झाली. पुतण्या हिला गोठ्यातून घेवून गेला. म्हणाला "देवळात जाऊन बस जरा. हीस नेले की बोलावणे पाठवतो." मन मानत नव्हते तरी जाणे भाग होते.

हळू हळू निघाली. दगडू वाटेत भेटला. गुरं गेल्यापासून दगडूचे घरी येणे बंदच झाले होते. म्हणाला "काकी कुठे निगलात? आज कामिनीला घेवून जाणार? तुमी कशा तयार जाला खाटकाला विकायला?" शांता जागीच थीजली. जीभ आत ओढायला लागली. घसा पार कोरडा पडला. अंगाला कापरं भरलं. दगडू घाबरला. “काकी, काकी, काय जाला? अशा काय करता?” शांता एकदम भानावर आली. उलट्या पावली परत निघाली.

खाटकाला घेवून पुतण्या आला कामिनीस देण्यास, त्याला गोठ्याच्या दारातच शांता भेटली चंडिकेच्या रुपात. हातात कोयता आणि नजरेत अंगारे!

"जिच्या दुधावर एवढा माजलास तिला खाटकास विकतोस? उद्या आपल्या जन्मदात्र्या आईस विकून खाशील की काय? कामिनीस हात लावायचा नाही. हा गोठा आमचा. बाकीच्या घराचा कर बाजार. मी अडवणार नाही. जीवात जीव असेपर्यंत ही खाटकास मिळणार नाही एवढे ध्यानी ठेव." सगळेच दोन पावले मागे सरकले. आज प्रथमच काकी कशास नाही म्हणत होती, आणि तिचा शब्द मोडण्याची ताकद व्यापारी वृत्तीच्या पुतण्यात नव्हती.

पुस्तक म्हणजे असतं तरी काय? वाचन का करावे?

तुम्ही एकदा असा विचार करून बघा. आपल्या आजुबाजूला अंगमेहनतीची, त्रासाची, कधी कधी किळस येईल अशी तर कधी धोक्याची कामं करणारी माणसं आपण पहातो. त्यांना ती कामं का करावी लागतात? त्यांना वाटत नाही का की AC मध्ये बसून मस्त आराम करावा? पण शिक्षणाच्या अभावी त्यांना ती करावी लागतात. आणि शिक्षण म्हणजे काय? एक तर पुस्तकं वाचणं किंवा ज्यांनी पुस्तकं वाचली अशांकडून ऐकणं, पहाणं. आपल्यात आणि वर उल्लेख केलेल्या लोकांत फ़रक काय असेल तर पुस्तकांचा. आणि म्हणून म्हणतात की पुस्तकं हे गुरू, मित्र आणि मार्गदर्शक असतात. पुस्तकांवर प्रेम करा. वाचा. आत्मसात करा. तुमची जगाकडे पहाण्याची नजर बदलेल. आणि जगाची तुमच्याकडे पहाण्याची नजर बदलेल.

चला तर मित्रांनो, एक भव्य चळवळ उभारुया. आपल्या आजूबाजूला वाचक तयार करूया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.

आम्ही बि घडलो

तुम्ही बि घडाना

वाचनाने माणूस सर्वार्थाने श्रीमंत होतो.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.